# ही खरी अमेरिका

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. 623

डॉ. दया पटवर्धन



REFBK-0029558
REFBK-0029558

रजि नं. ८६७७१ संदर्भ

# ही खरी अमेरिका...

संदर्भ
भू-प्रवास
८२३
२९५५८
१३।७।९८

## डॉ. दया पटवर्धन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
८२३
दा. क्र. २९५५८
१३।७।९८
वा. शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0029558

REFBK-0029558

*लेखिका*
*दया पटवर्धन*
१७८, सायन रोड, सायन (पश्चिम),
मुंबई - ४०००२२.

*प्रकाशक*
*गांगल पब्लिकेशन्स*
१० विसनजी पार्क
नायगाव क्रॉस रोड
दादर, मुंबई ४०००१४.

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

*प्रकाशन*
जून १९९७

*अक्षरजुळणी*
उद्‌गार

*मुद्रक*
काशिका

*मूल्य*
रुपये पन्नास मात्र

# लेखिकेचे मनोगत

१९७३ सालाच्या मे महिन्यात मी माझा मुलगा दिलीप पटवर्धन ह्याचेकडे अमेरिकेत गेले असता तेथील यलोस्टोन पार्क व इतर प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची मला संधी मिळाली. दिलीपचे को 'कॉलेज, सीडर रॅपिडस्, आयोवा, येथील सहकारी व स्नेही प्राध्यापक जॉन वॉकर हे तेथे धर्म व तत्त्वज्ञान या विषयांचे प्राध्यापक होते. त्यांच्यासारखे व्यासंगी, सुसंस्कृत मार्गदर्शक आम्हांला त्यावेळी लाभले, त्यामुळेच आमचा प्रवास आल्हाददायक तर झालाच, पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे त्यामुळे आमच्या मनाची क्षितिजे उंचावली.

१९७९ साली 'वाङ्मयशोभा' मासिकाचे संपादक श्री. मनोहर केळकर यांनी माझे प्रवासवर्णन 'ही खरी अमेरिका' या नावाने आपल्या मासिकाच्या एप्रिल, मे, जून व जुलै या महिन्याच्या अंकांत छापले. त्यावेळी त्यांनी या लेखाच्या सुरुवातीला हे प्रवासवर्णन प्रकाशित करण्याचे महत्त्व योग्य शब्दांत विशद केले होते.

'अमेरिकेची अनेक प्रवासवर्णने'

प्रसिद्ध झाली आहेत व अजूनही लिहिली जातील. असे असताही आम्ही हे पुस्तक प्रसिद्ध करीत आहोत याचे कारण लेखिकेने अमेरिकेच्या अंतर्भागात हिंडून अनेक सौंदर्यस्थळे टिपली असून त्यांचे यथायोग्य वर्णन केले आहे. अमेरिकेच्या अंतरंगांचे हे दर्शन वाचकांना विलोभनीय वाटेल. अमेरिकन लोकांनी आपल्या प्रेक्षणीय स्थळांपासून प्रवाशांना शक्य तितका आनंद व ज्ञान मिळावे म्हणून केवढे प्रयत्न केले आहेत! ते राष्ट्र श्रीमंत असल्यामुळे त्यांना पैसा पाण्यासारखा खर्च करून हे साध्य करता आले हे जरी खरे असले तरी ही निरनिराळी साधने वापरतांना त्यांनी कल्पकता, प्रतिभा, ज्ञानोपासना व परिश्रम यांचा जो समन्वय साधला आहे तो पाहून मन थक्क होते.

'अमेरिकेच्या अंतर्भागाचा प्रवास करून तेथला निसर्ग, तेथील मूळचे लोक, युरोपातील ज्या मूळ देशांतून आले तेथील संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न करणारे लोक, नैसर्गिक सौंदर्याला आधुनिकतेची जोड देऊन पर्यटकांना आवाहन करणारे कलाकार अशा सर्वांची ओळख या लेखमालेत झालेली आहे.

बऱ्याचशा अमेरिकेच्या

प्रवासवर्णनातून अमेरिकेतील मोठमोठ्या शहरांची वर्णने वाचावयास मिळतात. न्यूयॉर्क, शिकागो, लॉस एंजेलिस् अशा शहरांची भव्यता, अचंबा वाटण्यासारखी त्यांची आधुनिक साधने व अद्यावत् राहणी, यांची कल्पना येते. नायगारा फॉलस् किंवा डिस्ने लँड् यासारख्या प्रवाशांची आकर्षण स्थळे आपल्या परिचयाची आहेत पण माझ्या या प्रवासवर्णनातून अमेरिकन् लोकांचा इतिहास, त्यांची उद्योगप्रियता, त्यांचे समाजजीवन यांची कल्पना येईल. 'तेलाचा राजा' जॉन रॉकफेलर, 'पोलादाचा राजा' कार्नेजी यांनी आपली अपार संपत्ती परोपकारी कार्यांना देऊन टाकली व कुटुंबांना हयातीपर्यंत पुरेल येवढेच उत्पन्न ठेवले हे आपणास माहीत आहे. पण मोठमोठ्या स्मृति प्रतिष्ठाने, संस्था, मंडळे, अनुदाने यांनासुद्धा निर्माण करणे कठीण अशी स्मारके अगदी साध्या नागरिकांनी कोणत्याही अनुदानाची अपेक्षा न करता स्वकष्टाने उभारलेली पाहून परदेशी पर्यटक थक्क होतो. हॅरॉल्ड वॉर्प नावाचा माणूस रिंडन गावात जन्मला - तो पुढे उद्योगपती झाला. त्याने व त्याच्या कुटुंबियांनी मातृभूतीचे ऋण

फेडण्यासाठी १८३० पासून १९५३ पर्यंत अमेरिकेत घडत आलेला बदल दाखवण्यासाठी प्रचंड मेहेनतीने पायोनिअर व्हिमेन् हे स्थान निर्माण केले. मिचर्ड बंधूंना फिरत असता सहज रत्नांप्रमाणे चमकणाऱ्या निसर्गाने निर्माण केलेल्या कलासाइट् क्रिस्टलची (Calcite crystal) शोभिवंत गुफा सापडली आणि तेथे त्यांनी हौशी पर्यटकांसाठी एक नवीन स्थान निर्माण केले. या गुंफा त्यांनी रूझवेल्ट प्रेसिडेंट असताना १९३३ साली सरकारच्या ताब्यात दिल्या. माउंट एशमोर येथील उंच खडकांत खोदून कोरून बनवलेल्या चार प्रेसिडेंटस्च्या शिल्पांची निर्मिती एका व्यक्तीने चौदा वर्षे खपून पूर्ण केली. थंडरहेड पर्वताच्या कुशीत ५६३ फूट उंचीचा 'क्रेझी हॉर्स' नावाचा एका रेड् इंडिअनाचा पुतळा एका ६३ वर्षाच्या शिल्पकाराने आपल्या मुलामुलींच्या सहाय्याने स्वखर्चाने बनवला. मिचेल येथील धान्यप्रासाद हा सुद्धा नागरिकांच्या सामुदायिक मेहेनतीचे फलित आहे.

डॉ. वॉकर यांनी यलोस्टोन पार्कला जा ंना व येतानांचा रस्ता निराळा

निवडला होता. त्यामुळे आम्हांला तेवढ्याच खर्चात चार स्टेटस् मधील निरनिराळी प्रसिद्ध स्थळे पहावयास मिळाली. अर्थात हे सर्व थोड्या वेळांत आम्हांला साध्य करतां आले याचे कारण म्हणजे अमेरिकेतील रूंद रस्ते व त्या देशाच्या शासनाने केलेल्या प्रवाशांच्या सुखसोयी.

ही स्थळे पाहिल्यावर त्यांचे वर्णन करण्यासाठी व इतिहास जाणून घेण्यासाठी मला संशोधन करावे लागले ही माहिती कोठेही एकत्र मिळणे दुरापास्त आहे. मराठीतील तर ती कोणत्याही पुस्तकात मिळण्यासारखी नाही माझ्या 'वाङ्मयशोभे'तील लेखमालेने जिज्ञासू वाचकांना तिचा उपयोग व्हावा म्हणून ती पुस्तकरूपाने एकत्र छापावी असा विचार मनात आला. कारण मासिकाचे जुने अंक मिळणे कठीण असते. आणि म्हणूनच मी हे पुस्तक प्रकाशित करीत आहे. त्याच्या वाचनाने वाचकांचे मनही उल्हासित व समृद्ध झाले तर मी स्वत:ला धन्य समजेन.

दया पटवर्धन
१ जानेवारी १९९७

# प्रस्तावना

पूर्वी महत्त्वाकांक्षी सुशिक्षित तरुण इंग्लंडला जात असत; आता अमेरिकेला जातात. त्यामुळे अमेरिकेला प्रवास ही नवलाईची बाब राहिलेली नाही हे मान्य करूनही डॉ. दया पटवर्धन यांनी स्वतःच्या प्रवासातून खरी अमेरिका दाखवण्यास प्रवृत्त व्हावे हे मला खरोखर कौतुकास्पद वाटते.

आमचे सुशिक्षित भारतीय न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, लॉस ॲंजेलिस यांसारख्या विलासी शहरांतून वावरत असतात. त्यांनी एकदा लखिकेप्रमाणे जुन्यांत जुन्या विवक्षित भागांतून फेरफटका केला तर त्यांना जुनी पण अजूनही टिकून राहिलेली 'खरी अमेरिका' कशी आहे याचा अनुभव येईल. 'पायोनीयर व्हिलेज' सारखे एकीकडचे खेडे, पुढे स्वावलंबी व संपन्न बनले यामागचे रहस्य काय? तर तिथे जन्मलेल्या पण नंतर शिकागोत उद्योगपती बनलेल्या वार्प नावाच्या माणसाला आपल्या जन्मभूमीचे ऋण

फेडण्याची बुद्धी झाली हे गावकऱ्यांच्या मदतीने व स्वत:च्या पैशाने त्याने या गावाचे छोट्या शहरात रूपांतर केले. आज तिथे वातानुकुलित हॉटेले आहेत आणि ३०,००० पुराण वस्तू जपणारा म्यूझियम सुद्धा आहे. अमेरिकेसारखी अफाट भूमी ताब्यात आल्यावर वसाहतवाल्यांनी अपार कष्ट करून आणि विलक्षण कल्पकतेने तिला जगातले प्रथमांकाचे राष्ट्र कसे बनवले याचे रहस्य पायोनीयर व्हिलेज सारख्या गावांवरून लक्षात येते. आयोवा, वायोमिंग, नेब्रास्का, साऊथ डाकोटा यांसारख्या राज्यांना लेखिकेने भेट दिली त्या प्रदेशातच अमेरिकनांच्या कर्तृत्वाची बीजे पेरली गेली होती असे म्हणायला हरकत नाही. यलोस्टोन पार्कचे विस्तीर्ण उद्यान - ज्यात जुने हजार वर्ष वयाचे वृक्ष आणि जुने नवे नाना जातींचे प्राणी ठेवलेले आहेत ते असेच एक इतके कल्पनारम्य ठिकाण आहे, की ते सोडताना लेखिकेला वाईट वाटले. या प्रेक्षणीय स्थळांची अमेरिकन राज्यकर्ते व जनता अतोनात काळजी घेतात, आणि ती पर्यटकांना मोठ्या अभिमानाने व व्यवस्था राखून

दाखवतात. आपली संस्कृती तर अमेरिकेपेक्षा कित्येक पटींनी जुनी आहे, पण आपण एवढी दक्षता कधी बाळगतो का? माऊंट रश्मोरच्या पहाडी भिंतीत इतिहासप्रसिद्ध अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे चेहरे कोरलेले आहेत. एक विराट खडकाळ कलाकृती ती आपण पाहू शकतो तारेला लटकणाऱ्या ट्रॅमधून. साऊथ डाकोटात सोन्याच्या खाणी सापडल्या, आणि 'ज्युवेल केव्हज्' किंवा रत्नगुंफा पण! ही तर निसर्गानेच या देशाला दिलेली श्रीमंती आहे. सोन्याच्या हव्यासापायी वसाहतवाल्यांनी इथल्या रेड इंडियनांशी लढाया केल्या, त्यांना लुटले. पुढे अब्राहम लिंकनच्या कारकीर्दीत नीग्रो लोक सुद्धा गुलामगिरीतून मुक्त झाले पण त्या बिचाऱ्या रेड इंडियनांच्या वाट्याला मात्र तेवढा दिलासा आला नाही. लेखिका ज्या भागात हिंडली तिथे इंडियनांसाठी अद्यापि आरक्षित भूखंड (किंवा कोंडवाडे) आखून दिलेले तिला आढळले. आणि तरी या आदिवासींच्या औदार्याचा व आतिथ्याचा तिला जागोजागी अनुभव आला.

गोऱ्या अमेरिकनांचे कर्तृत्व व

दातृत्व अचाट आहे. (एडिसन, फोर्ड, रॉकफेलर, कार्नेजी ही नावेच पाहा ना.) नाना देशांतून आलेल्या लोकांना त्यांनी आपलेसे करून घेतले आहे. पण हे वैभव वसाहतवाल्यांनी रेड इंडियनांना हतप्रभ करून मिळवलेले आहे या जाणिवेने दया विषण्ण झाली.

लेखिकेचा नामनिर्देश करताना मी एकदम एकेरीवर आलो याचे वाचकांना आश्चर्य वाटेल. पण हे सहजगत्या घडले आहे. या संदर्भात एक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. पूर्वाश्रमीची दया परांजपे ही माझी आतेबहीण. शाळकरी वयात तिने व मी घरात पडलेल्या एका मामुली इंग्रजी कादंबरीचे मराठीत रूपांतर केले होते. आणि चमत्कार असा की एका प्रख्यात प्रकाशनसंस्थेने ते छापण्याचा वेडा विक्रमही केला! दयाचे दिवंगत पती पटवर्धन माझे दोस्त होते. साहसकथांच्या बाबतीत त्यांची व माझी आवड जुळल्यामुळे आम्ही मुंबईत अमेरिकन 'काऊबॉइज्' चित्रपट बघायला जोडीने जात असू. 'बफेलो बिल'च्या शौर्याबद्दल मला वाटणारं कौतुक दयाचं हे

पुस्तक वाचल्यावर एकदम घसरणीला
लागलं. कारण गवा हा ऐटबाज रानरेडा
आज नामशेष झाला आहे; आणि याला
एक कारण त्याची शिकार करण्यात
एकट्या बफेलो बिलने शेकडो रेड
इंडियनांवर मात केली होती. त्याने दीड
वर्षांत म्हणे ५००० बफेलो ठार मारण्याचा
पराक्रम केला!

अशी काही वैशिष्ट्य या पुस्तकात
आहेत. आणि अमेरिकेबद्दलचं कुतूहल
आपल्याकडे आज देखिल वाढतं आहे.
त्यामुळे 'स्वैरी अमेरिका' वाचकाला एक
आगळा आनंद देईल यात शंका नाही.

भा. रा. भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
823
३९५५८

अमेरिकेचा प्रवास करणे ही काही आता नवलाईची गोष्ट राहिलेली नाही. अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेल्या भारतीयांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. कित्येक मंडळींनी अमेरिकेच्या प्रवासाची वर्णने मराठीत लिहिलेली आहेत. तेव्हा आणखी एका प्रवासवर्णनाची त्यात भर कशाला पाहिजे असे

वाचकांस प्रथमदर्शनी वाटेल. पण आयोवा प्रांतातील सीडर रॅपिड्स् या शहरापासून यलोस्टोन पार्कपर्यंतची जी सफर मी केली, ती इतर प्रवासांपेक्षा निराळी आहे. बहुतेक उपलब्ध प्रवासवर्णनांत आपणास अमेरिकेतील मोठमोठ्या शहरांची माहिती वाचावयास मिळते. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, लॉस एंजेलिस्, शिकागो, नायगारा फॉल्स अशा प्रसिद्ध शहरांची व स्थळांची वर्णने अनेक प्रवासवृत्तांतात वारंवार येऊन गेलेली आहेत. पण मी अशा प्रसिद्ध शहरांची वर्णने देणार नाही. शहरांपासून दूर, अगदी अमेरिकेच्या अंतर्भागात मी मोटरने प्रवास केला व खरी अमेरिका पाहिली. या प्रवासात मी घनदाट अरण्ये, उंच उंच पर्वत, बर्फमय प्रदेश, सरोवरे व धबधबे पाहिले; सरपटणाऱ्या प्राण्यांची संग्रहालये पाहिली; निसर्गाने निर्माण केलेल्या भूगर्भातील 'रत्नगुंफा' पाहिल्या; ह्याबरोबरच मानवाने निसर्गावर केलेली कलाकुसरही पाहिली. खडकात कोरलेल्या महापुरुषांच्या मुद्रा, अजस्त्र पुतळे पाहिले. प्लॅनेटेरियम्स, वस्तुसंग्रहालचे, 'धान्यप्रासाद' मला बघायला मिळाले. याशिवाय डुलणारी शेते, कुरणात चरणाऱ्या गाई व डुकरे, दाराशी मोटार असणाऱ्या शेतकऱ्यांची संपन्नावस्थेतील घरे व धान्यकोठारे पाहिली. छोटीछोटी गावे, त्यामधे असणारी बंगलीवजा घरे, चर्चेस व वाचनालये ही पाहत असताना अमेरिकेच्या शांत सौंदर्याचे दर्शन झाले. ही विविध स्थळे पाहत असता इतिहासाच्या खुणा दिसल्या. एकेकाळी या विस्तीर्ण प्रदेशावर रेड इंडिअन लोकांचे साम्राज्य होते ते हिसकावून घेण्यासाठी गोऱ्या लोकांनी ज्या लढाया दिल्या, जे प्रयत्न केले, त्याचे ठसे अमेरिकेच्या भूमीवर ठिकठिकाणी दृग्गोचर होतात. ते

पाहत असता माझ्या मन:श्चक्षूसमोर अमेरिकेचा इतिहास सजीव झाला. मी पाहिलेल्या ह्या खऱ्याखुऱ्या अमेरिकेचे वाचकांनाही दर्शन घडावे हा या प्रवासवर्णनाचा हेतू आहे.

मला ही जी अमेरिका बघण्याची संधी मिळाली. तिचे श्रेय माझा मुलगा दिलीप व त्याचे मित्र डॉ. वॉकर यांना दिले पाहिजे. दिलीप त्यावेळी आयोवामधील सीडर रॅपिड्स् ह्या सुंदर छोटेखानी शहरात असणाऱ्या को-कॉलेजमध्ये व्हिजिटिंग असिस्टंट प्रोफेसर होता त्या कॉलेजने आयोजित केलेल्या इन्पॅक (INPAC) प्रोग्रॅममध्ये भारत, पाकिस्तान व सिलोन या देशांच्या सांस्कृतिक इतिहासाचे मूल्यमापन हा त्याच्या अध्यापनाचा विषय होता व तो शिकविण्यासाठी दिलीपची खास नेमणूक झालेली होती. डॉ. जॉन वॉकर हे को-कॉलेजमध्येच धर्म व तत्त्वज्ञान या विषयांचे प्राध्यापक होते. त्यांना भारताविषयी खास आकर्षण होते. त्यांनी भारताला दोन वेळा भेट दिली होती. एकदा तर हृषिकेश येथे एक वर्षभर राहून त्यांनी हिंदुधर्माचा अभ्यास केला होता. अमेरिकेचा इतिहास, समाजरचना व संस्कृती यांचे त्यांना खोल ज्ञान होते. अमेरिकेत जन्म व शिक्षण, तेथील ॲरिझोना, मेक्सिको, न्यूयॉर्क, शिकागो या ठिकाणी त्यांनी वास्तव्य केलेले होते. त्यांना प्रवासाची अत्यंत आवड. यलोस्टोन पार्कला ते अनेक वेळा गेले होते. त्यांना निसर्गाचे प्रेम होते. अमेरिका दाखविण्याची हौस होती. असे जाडे व्यासंगी, सुसंस्कृत मार्गदर्शक आम्हांला या प्रवासात लाभले हे आमचे भाग्यच होय. त्यांनी व दिलीपने आमच्या सफरीचा आराखडा तयार केला. नकाशे पाहून आमच्या जाण्याचा व येण्याचा मार्ग निश्चित केला.

शिवाय त्यांनी रस्ते असे निवडले की वाटेत अमेरिकेतील निरनिराळी प्रेक्षणीय स्थळे बघता यावीत. थोड्या अवधीत इतकी स्थळे बघणे शक्य झाले याचे कारण म्हणजे अमेरिकेतील सुसज्ज रस्ते, उपलब्ध नकाशे व प्रवाशांना मिळणाऱ्या सुखसोयी हेच होय. आठ दिवसांत आम्ही २७७० मैलांचा प्रवास केला. रोजचे ४५० ते ६०० मैलांपर्यंत अंतर कापू शकलो.

जातानाचा व येतानाचा रस्ता निराळा असल्याने आम्ही तेवढ्याच प्रवासात व खर्चात चार स्टेट्सूमधील प्रसिद्ध स्थळं पाहू शकलो. रात्रीचा आमचा मुक्काम बहुधा मोटेलमध्ये असे. खोलीचे भाडे १६ ते २० डॉलर्स असे. तेथे फक्त अंघोळीची सोय असे. चहा व ब्रेकफास्ट् जवळच्याच रेस्टॉरॉमध्ये करून आम्ही सकाळी प्रवासाला निघत असू. दुपारी जेवणाची व्यवस्था उपाहारगृहात होई. येथे पुन्हा डॉ. वॉकर यांच्या मुरब्बी अनुभवाचा फायदा झाला. कोणत्या रेस्टॉरॉमध्ये काय मिळते हे माहीत असल्याने ते निवडक ठिकाणी आम्हांस घेऊन जात. आम्हांला दोघांना एकंदर खर्च-मोटार, राहणे, जेवणे वगैरे धरून-फक्त ४०० डॉलर्स आला.

सीडर रॅपिड्स् हे आयोवा स्टेटमधील सर्वांत आकर्षक असे शहर आहे. आयोवामधील अत्यंत उत्तम असे दूरदर्शन केंद्र या शहरातच आहे. येथून वीस मैलांवर असणारे आयोवा सिटी हे एक सांस्कृतिक केंद्र समजले जाते. तेथील विद्यापीठ वैद्यकीय शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. ६९ मैलांवर एम्स येथे आयोवा स्टेट युनिव्हर्सिटी हे दुसरे विद्यापीठ आहे. या दोन विद्यापीठांच्या व सीडर रॅपिड्सूमधील को-कॉलेज, या पदवी देणाऱ्या ऑटोनॉमस

संस्थेच्या सान्निध्याने हे शहर उच्चभ्रू वातावरणाचे केंद्रच बनले आहे असे म्हणावयास हरकत नाही.

आयोवा हे नाव रेड इंडिअन लोकांनी दिलेले आहे. त्याचा अर्थ मराठीत 'हेच ते स्थान' असा आहे. ह्या नावावरून इंडिअन लोकांना हा प्रदेश किती आवडत असेल याची कल्पना येते. गुरे, मेंढरे व डुकरेही या प्रांताची संपत्ती होय. अमेरिकेतील टेक्सास् स्टेटच्या खालोखाल आयोवामध्ये पशुसंपत्ती असून तेथे ७० लक्षांहून अधिक जनावरे पोसली जातात. अमेरिकेतील दुभत्या गाईत आयोवाचा नंबर सहावा लागतो या स्टेटमध्ये ४०,००० शेते आहेत. या शेतकऱ्यांचे जीवन सुखी असते. शहरातील कोंदट हवेपेक्षा शेतातील मोकळ्या हवेत राहणे कुटुंबाच्या दृष्टीने शेतकऱ्यांना अधिक आरोग्यदायक वाटते. शनिवार-रविवारी हे शेतकरी आपल्या मोटारगाड्यातून जवळच्या शहरात जातात व एखाद्या कंट्री क्लबमध्ये गोल्फ खेळतात. पण आयोवात शेती हा एकच व्यवसाय नाही. या स्टेटमध्ये अनेक उद्योगधंदे आहेत. शेतीला लागणारी यंत्रे, इतकेच काय पण विमानाला लागणारी साधने व यंत्रेही आयोवात तयार होतात. चाळीस टक्के शेतकरी या कारखान्यात कामे करून शनिवार-रविवारी शेती करतात. आयोवात अमाना नावाचे जर्मन वसाहतीचे गाव आहे येथील कारखान्यात स्वयंपाकाला लागणारी इलेक्ट्रिकची नवनवीन साधने, इतकेच काय, पण रेफ्रिजरेटर्सही बनवतात. याशिवाय लोकरीचे कपडे, तऱ्हतऱ्हेचे फर्निचर, मांस पॅकबंद करणे यासाठीही अमाना प्रसिद्ध आहे. येथे बनवलेली उंची दारू व रुचकर खाद्यपदार्थ यांची अमेरिकेत सर्वत्र ख्याती आहे.

सीडर रॅपिड्स् येथील कॉलिन्स कंपनीत अनेक एंजिनिअर काम करतात. त्यात कित्येक भारतीय आहेत.

अशा या आयोवा स्टेटमधील सिडर रॅपिडस्स् या शहरातील आमच्या निवासस्थानापासून आम्ही २९ मे १९७३ रोजी सकाळी यलोस्टोन पार्कच्या प्रवासाला निघालो. प्रथम आम्ही डॉ. वॉकर यांच्या घरी गेलो व त्यांना बरोबर घेऊन आमची मोटर वेगाने धावू लागली. रस्ता सरळ व रूंद होता. सूर्यप्रकाशात बाजूची शेते व तुरळक घरे चमकत होती. जोंधळा व बाजरीसारखी दिसणारी सरघॅम धान्याची शेते दुरून काळसर गर्द हिरव्या रंगाच्या पट्ट्यांसारखी दिसत होती. मधूनच झाडांचे पुंजके दिसत. सफेद किंवा तांबड्या रंगाची शेतकऱ्यांची घरे सभोवतालच्या फुलझाडांच्या सान्निध्याने नीटनेटकी व उठून दिसत. या रस्त्याने जात असता आम्हाला 'टामा' ही रेड इंडियन लोकांची छोटीशी वसाहत दिसली. तेथून आम्ही आयोवा स्टेटची राजधानी डी मॉइन्स या शहराला वळसा घालून ओमाहा या शहरात पोचलो व नंतर नेब्रास्का या स्टेटमध्ये प्रवेश केला. अमेरिकेतील शहरे उत्तम आखणीची व सुबक असतात. ओमाहा शहराचा विस्तार ५२ मैल असला तरी लोकवस्ती फक्त साडेतीन लाखाच्या आसपास आहे. एवढ्या लोकवस्तीत अडीच लाख रेडिओ आणि १ लाख ७० हजार टी.व्ही. सेट्स आहेत. यावरून अमेरिकेतील संपन्नता व ज्ञानप्रसाराची हौस यांची कल्पना येते.

दुपारी बारा वाजता आम्ही एका 'पिकनिक् स्पॉट्' पाशी पोचलो. लांब जाणाऱ्या हायवेजूवर अशी स्थळे थोड्याथोड्या अंतरावर असतात. तेथे अतिशय स्वच्छ असे शौचकूप, स्नानगृहे

व वॉश बेसिन्स २४ तास पाणी खेळत असते. बेसिनवर साबण व कागदी हातरुमाल ठेवलेले असतात. रस्त्याच्या कडेला हिरवळीवर भोजनासाठी लाकडी टेबले व त्याच्या जोडीला बसण्यासाठी बाके ठेवलेली असतात. तेथे बसून आम्ही बरोबर आणलेल्या सँडविचेस्, उकडलेली अंडी, फळे, व फळांचा रस प्राशन केला. रस्त्यावरून प्रवास करणारे इतर लोकही मोटारी थांबवून उपाहार करीत होते. मात्र एक गोष्ट अमेरिकेत लक्षात येते ती म्हणजे आपल्याकडे जशी रस्त्यांवर खेडेगावात छपरे घातलेली उपाहारगृहे दिसतात तशी येथे दिसत नाहीत. याचे कारण असे समजले की, अशा प्रकारे चहा व खाद्यपदार्थ विकण्याची परवानगी विक्रेत्यांना सहजासहजी मिळत नाही. त्यामुळे अर्थातच इतस्तत: पसरलेले कागद, माशा यांचाही उपद्रव होत नाही.

भोजनानंतर आम्ही लिंकनच्या दिशेने प्रवासास सुरुवात केली.

लिंकन हे शहर ओमाहाच्या पश्चिमेस ६० मैलांवर असून ते ओमाहापेक्षा अगदी निराळे आहे. ते हिरव्यागार प्रदेशात वसलेले असून स्वच्छ व शानदार आहे. त्याची वस्ती १९७० साली १४९,५१८ इतकी होती.

लिंकन येथील युनिव्हर्सिटीत ३२००० विद्यार्थी असून त्याची एक शाखा ओमाहाला आहे. शेतीविषयक शिक्षण व संशोधन यावर या विद्यापीठाचा १/३ खर्च होतो. याशिवाय हे विद्यापीठ नेब्रास्काच्या वाङ्मयीन व सांस्कृतिक जीवनाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. संगीत, नाट्यकला, चित्रकला व शिल्प यांसाठीही या विद्यापीठाचा नावलौकिक आहे.

दुपारी तीनच्या सुमारास आम्ही लिंकनला पोचलो. पोचताच आम्ही स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ नेब्रास्कामध्ये प्रवेश केला. नेब्रास्का हे मूळचे रेड इंडियन नाव असून त्याचा अर्थ 'सपाट पाणी' असा आहे. अमेरिकेतील इतर युनिव्हर्सिटीचेही कँपस् विस्तीर्ण असून त्यात अनेक इमारती होत्या. आम्ही विद्यापीठाचे वस्तुसंग्रहालय पाहावयास गेलो. वस्तुसंग्रहालय फारच भव्य होते. हजारो वर्षांपूर्वी अमेरिकेत जे अजस्त्र प्राणी संचार करीत असत, त्यांचे सांगाडे त्यात ठेवले होते. तेथील जगप्रसिद्ध हत्तीखान्यात (एलेफंट हॉल) १४ फुटांपेक्षा अधिक उंचीचा आर्ची या नावाच्या हत्तीचा सांगाडा होता. हा हत्ती ७०,००० वर्षांपूर्वी नेब्रास्कामध्ये राहत असावा. याच हत्तीखान्यात, २ कोटी वर्षांपूर्वी (वीस मिलियन वर्षे) आशियात राहणाऱ्या पृथ्वीवरील सर्वात अजस्त्र अशा सस्तन (मॅमल) प्राण्याची प्रतिकृती पाहायला मिळाली. हा प्राणी म्हणजे १८ फूट उंचीचा गेंडा (ऱ्हिनोसेरॉस्) तो हत्तीपेक्षा उंच दिसतो. हत्तीचे दात मात्र अजस्त्र दिसतात. या वस्तुसंग्रहालयात हजारो वर्षांपूर्वी अमेरिकेत राहणारे प्राणी स्टफ् करून ठेवले आहेत. त्यानंतर आम्ही तेथील प्लॅनेटेरियम् पाहायला गेलो. डॉ. वॉकर यांच्या आग्रहावरून तेथील व्यवस्थापकांनी आम्हाला त्याची यंत्रणा दाखवली. या तारामंडळात आपल्याला सूर्य, चंद्र, तारे, ग्रहमाला यांच्या गती अगदी जवळून बघायला मिळतात. आता आपल्या मुंबईतही असे एक नेहरू प्लॅनेटेरियम सुरू झाले आहे या तारामंडळात (प्लॅनेटेरियम्‌मध्ये) आपल्याला खुर्चीवर बसल्या बसल्या रॉकेटमधून प्रवास करणाऱ्या आकाशवीरांना

(ॲस्ट्रोनॉट्स) जे भव्य चित्र दिसत असेल, ते बघावयास मिळते. आम्हाला तेथे अंतरिक्षात वादळ चालू असल्याचा अनुभव मिळाला. टेपरेकॉर्डवर सर्व माहिती सांगण्यात येत होती. एका विद्यापीठाच्या प्रांगणात ही चमत्कृती अनुवण्यास मिळाल्याने आश्चर्य वाटले.

आम्ही मोटारीत बसत असता हेच विचार मनात घोळत होते. आता डॉ. वॉकर गाडीच्या चाकापाशी बसले. इतका वेळ दिलीप गाडी चालवीत होता. गाडीतील रेडिओ संगीताने करमणूक करीत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दूरवर पसरलेली शेते व कुरणात चरणाऱ्या गुटगुटीत गाई, शेतकऱ्यांची धान्य ठेवण्याची काचेची कोठारे दिसत होती. येथील गाई ठेंगण्या असतात. त्यांना धान्य खायला घालून लठ्ठ करतात व नंतर त्यांची कत्तल होऊन त्यांचे खाद्यपदार्थात रूपांतर होते. तीनचार वर्षे या गाई सुखात व आरामात आयुष्य काढतात. खाण्यापिण्याची चंगळ असते. त्यानंतर आपल्याला एक दिवस कत्तलखान्यात जावे लागणार याची त्यांना कल्पनाही नसते. कीट्स् कवीच्या 'Happy Insensibility' या कवितेची आठवण झाली. आपल्या देशात आपण गाईची पूजा करतो. पण त्यांना लाभणारे अर्धउपाशी खडतर दीर्घ आयुष्य बरे की या गाईंचे छोटे पण खाऊनपिऊन सुखी आयुष्य चांगले असा विचार मनात आला. पाश्चात्य लोक पाळलेल्या जनावरांवर प्रेम करतात. पण जनावरांना केवळ त्यांच्या मांसासाठी पोसण्याचा व्यवहारी विचार त्यांना निर्दयपणाचा वाटत नाही याचे आश्चर्य वाटते. अमेरिकन लोक अशा प्रकारे धान्य स्वत: न खाता ते गुरांना खावयास घालतात व

त्यांच्या शाकाहारावर पोसलेल्या रक्तमांसावर आपले पोषण करतात. शेतकरी आपल्या कुटुंबातील दोनचार माणसांच्या सहाय्याने शेकडो एकर शेती एकटा करतो. शेताच्या मध्ये रमणीय ठिकाणी एखादे बंगलेवजा निवासस्थान दिसते ते त्याचे घर. पोर्चमध्ये एक किंवा अधिक मोटारगाड्या उभ्या असतात. त्यावरून त्याची संपन्नावस्था लक्षात येते. ते बघून शेतीवर रात्रंदिवस राबणाऱ्या व उघड्या-बागड्या अवस्थेत अर्धपोटी राहणाऱ्या आपल्या शेतकऱ्याची आठवण झाली व मन विषण्ण झाले.

नेब्रास्का हा शेतीप्रधान देश आहे परंतु तरीसुद्धा हा प्रांत निव्वळ शेतीवर अवलंबून नाही याचे आश्चर्य वाटले. या प्रांतात शेतीबरोबरच शेतीला लागणारी यंत्रे, कापड, फिरती घरे (mobile homes) खते, उपकरणे, विद्यतपरमाणु विषयक (electronic) साधनांचे सुटे भाग यांचेही उत्पादन होते. १९३९ साली या प्रांतात तेल सापडले. १९४९ मध्ये गॅस मिळाला. त्यामुळे तेलाच्या उत्पादनातही हा प्रदेश अग्रगण्य आहे. अमेरिकेतील शेतीप्रधान प्रांतातही शेतीबरोबरच इतर उद्योगधंदेही सुरू केलेले दिसतात. त्यामुळे प्रत्येक प्रांत स्वयंपूर्ण व संपन्न स्थितीत आढळतो.

नेब्रास्कातून जात असता आम्हांला रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दूरवर पसरलेली शेते, पिकांना हलवणारा मंद वारा व सूर्यप्रकाश यांचे दर्शन होत होते. त्यात धान्यकोठारे व शेतकऱ्यांची सफेद घरे उठून दिसत होती. आम्ही पश्चिमेकडे जाऊ लागलो तशी शेते कमी होऊन कुरणे दृष्टिपथात आली. या

कुरणात अनेक गुरे चरताना दिसू लागली. म्हणजे नेब्रास्काच्या पूर्वभागात विस्तृत धान्यपट्टा पसरलेला आहे व तो भाग शेतीप्रधान आहे. पश्चिमेकडे कुरणांचा प्रदेश आहे. तेथील जीवन अधिक शांत व संथ लयीचे वाटू लागले. असे म्हणतात की त्यामुळे या प्रदेशात राहणाऱ्या लोकांत हृदयविकाराचे प्रमाण अमेरिकेच्या इतर प्रांतापेक्षा कमी आढळते. येथील लोक फूटबॉलचे मोठे शौकीन आहेत. लिंकन युनिव्हर्सिटीत 'बिग् रेड' या स्टेडिअममध्ये हा खेळ पाहणाऱ्यांसाठी ६८०० खुर्च्या आहेत.

नेब्रास्काचा प्रदेश पाहत आम्ही संध्याकाळी हेस्टिंग्ज या शहरात पोचलो. शांत नेब्रास्कातील हे शहर गडबड व आवाज यांचे एकमेव केंद्र आहे. आसमंतातील गुरांच्या प्रदेशात वसलेले हे शहर, त्यामुळे ते मुख्यत: गुरांचा बाजार व मांस पॅकिंग करण्याचे ठिकाण यासाठी प्रसिद्ध आहे.

हेस्टिंग्ज हे एक छोटेसे गाव आहे पण अमेरिकेतील सर्व छोटेखानी गावांप्रमाणे येथे एक, सर्व खाद्यपदार्थ मिळणारे मार्केट आहे. एक चर्च, वाचनालय, सिनेमागृह, सार्वजनिक बगीचा, चित्रांसारखी दिसणारी व सभोवताली बाग असणारी ती शांत बंगलेवजा घरे - हे सर्व पाहून मी प्रसन्न झाले. अमेरिकेत शहरापासून दूर राहणारास शहरातील सर्व सुखसोयी उपलब्ध असतात. त्यामुळे शहराच्या गडबडीपासून लांब राहूनही माणसाला बौद्धिक व मानसिक सुख लाभते. डॉ. वॉकर यांचे बंधूही धर्म व तत्त्वज्ञान या विषयांचे प्रोफेसर असून ते हेस्टिंग्जला राहतात. त्यांनाही भारताची ओढ असून नुकतेच तीन वर्षांपूर्वी ते पत्नीसह, काही विद्यार्थ्यांबरोबर भारतात आले होते तेव्हा त्यांची

व माझी भेट झाली होती. आम्ही गेलो त्यावेळी प्रो. वॉकर व त्यांची पत्नी दुसरीकडे प्रवासास गेली होती. डॉ. वॉकरनी सीडर रॅपिड्ड्सहून त्यांना फोन करून त्यांच्या घरात एक रात्र वास्तव्य करण्याची परवानगी घेतली होती. त्यांनी आपल्या घराची किल्ली डॉ. वॉकर यांना मिळण्याची व्यवस्था करून ठेवलेली होती. आम्ही त्यांच्या घरीच अवश्य राहावे असा आग्रह केला होता. दिवसभराच्या प्रवासानंतर पुन्हा घरी पोचल्याचे समाधान आम्हाला त्यांच्या निवासस्थानी मिळाले.

प्रो. वॉकर यांचे घर प्रशस्त होते. त्यांची लायब्ररी व दिवाणखान्यातील नानाविध मासिके त्यांच्या सुसंस्कृतपणाची साक्ष देत होती. त्यांच्या घराला इतर अमेरिकन घरांप्रमाणे सुसज्ज असे तळघर होते. तेथे नुसती अडगळ ठेवलेली नव्हती तर वाचनास व विश्रांतीस अनुकूल अशा आरामशीर खोल्या होत्या. तळघरातील स्वयंपाकघरात फळ्यांवर अनेक खाद्यवस्तूंचे डबे दिसले. 'सेल'मध्ये वस्तू स्वस्त मिळतात. यावेळी गृहिणी सूप, फळांचे रस, भाज्या व इतर खाद्यपदार्थ यांचे डबे घेऊन ते ठेवून देतात. तळघर पाहून आम्ही वर स्वयंपाकघरात आलो. डॉ. वॉकरनी अगोदर रेफ्रिजरेटर उघडला. त्यांत काय पदार्थ होते ते पाहिले त्यांचे बंधू आदल्या दिवशीच बाहेर गेले होते. त्यामुळे तेथे लोणी, चीज वगैरे पदार्थ दिसले. डॉ. वॉकर म्हणाले, 'चला, आता आपण ग्रोसरीत जाऊन अंडी, पाव, दूध, फळे वगैरे आणूया. ह्यापुढे आपल्याला रेस्टोरॉंचे जेवण घ्यावे लागणार आहेच, पण आज घरी राहण्याची संधी मिळाली आहे. तेव्हा आज रात्री घरीच जेवण बनवूया. मग उद्या सकाळी ब्रेकफास्ट झाल्यावर

इथून निघताना बरोबर आपल्याला पिकनिक् लंचही घेता येईल.' आम्ही लगेच ग्रोसरीत गेलो व सामान घेऊन परत आलो. फुलवरचा पुलाव बनवला. डब्यातील फळांचा रस प्राशन केला. घरात सूप व पुडिंगचे डबे होतेच. त्यातील दोन तीन डबे फोडून त्यांतील पदार्थांचाही समाचार घेतला.

रात्री प्रो. वॉकर यांच्या घरातील आरामशीर शय्यागृहात गाढ झोप लागली. सकाळी उठलो, तो डॉ. वॉकर उठून, शॉवरवर अंघोळ करून पुस्तक वाचीत बसले होते. मला माझ्या आळसाची जरा लाज वाटली. मी मुखमार्जन करून स्वयंपाकघरात गेले तो डॉ. वॉकरनी स्क्रँबल्ड एग् बनवलेले होते. आम्ही ब्रेकफास्ट घेतला. दिलीप मोटारची तयारी करायला गेला, तेवढ्यात मी अंघोळ करून घेतली. घरी पत्र लिहिले व स्वयंपाकघरात आले तो डॉ. वॉकर पिकनिक् लंच तयार करू लागले होते. ते स्वयंपाक उत्तम करीत. भारतीय पद्धतीचे भोजन करण्याची त्यांना हौस होती. अमेरिकन् पुरुष घरकामात खूपच लक्ष घालतात हे त्यांच्या उदाहरणावरून दिसून आले. मी घाईघाईने त्यांच्या मदतीला गेले. आम्ही चीज् व बीफ् अशा दोन तऱ्हेच्या शाकाहारी व मांसाहारी रुचीला चालतील अशा सँडविचेस् करून घेतली. अंडी उकडून घेतली. फळांच्या रसाचे तीन डबे घेतले व पिकनिक् लंच तयार झाली. जाताना आम्ही आणलेले चीज रेफ्रिजरेटरमध्ये ठेवून दिले. घराचे मालक प्रवासाहून परत आले म्हणजे त्यांना त्याचा उपयोग होईल, असा आम्ही विचार केला. त्यांच्याकडून घेतलेल्या पाहुणचाराची अगदी अत्यल्प तरी फेड केल्याचे समाधान झाले.

तोपर्यंत सकाळचे आठ वाजले. आम्ही तिघे पुढील

प्रवासाला निघालो.

हेस्टिंग्ज सोडल्यावर मोटरने एका तासाच्या अंतरावर असणारे पायोनिअर व्हिलेज् हे अप्रतिम स्थान बघण्यास आम्ही थांबलो. नेब्रास्कामधील मिंडन या गावात जन्मलेला हॅरॉल्ड वॉर्प नावाचा माणूस पुढे शिकागों येथे मोठा उद्योगपती झाला. १९४८ साली त्या गावातील त्याची छोटी शाळा विकण्यात आल्याचे त्याला कळले. तेव्हा पायोनिअर व्हिलेजसारखे स्थान निर्माण करून आपण आपल्या मातृभूमीचे ऋण फेडावे अशी त्याला कल्पना सुचली. त्याचे हे स्वप्न साकार व्हावयास पाच वर्षे लागली. १९५३ मध्ये पायोनिअर व्हिलेज तयार झाले. या ठिकाणी अमेरिकेच्या जुन्या संस्थापकांनी आपला देश छोट्यापासून मोठा कसा केला हे दाखवले आहे. १८३० साली अमेरिकेचे औद्योगिकरण सुरू झाले. त्या १८३० सालापासून आजतागायत या भूमीचा कसा विकास होत गेला हे या स्थळी दाखवले आहे. १८३० सालापासून तो १९५३ पर्यंत अमेरिकेत घडत असलेले बदल दाखविण्यासाठी हॅरॉल्ड वॉर्प, त्याची बहीण सेरा व तिचा पती असे तिघे, मैलोगणती फिरले व त्यांनी या कालखंडातील बदलत गेलेली घरे, स्वयंपाकघरातील यांत्रिक साधने, शाळा, चर्चेस, वाहने, यांचे यथायोग्य चित्रण करण्यासाठी ठिकठिकाणी अस्सल नमुने गोळा केले. आज पायोनिअर व्हिलेज हे वीस एकर जमिनीवर पसरलेले आहे. त्यात २३ इमारती असून ३०,००० ऐतिहासिक वस्तू ठेवलेल्या आहेत. येथे इतके पाहण्यासारखे आहे की ते एका दिवसात पाहून संपत नाही. म्हणून राहण्यासाठी एक मोटेल असून तेथे ६६ वातानुकुलित खोल्या

आहेत त्या टी. व्ही. वगैरे साधनांसकट सुसज्ज असून साधारण स्थितीतील कुटुंबाला परवडतील अशा दराने मिळू शकतात. शाळेतील मुलांकडून हा म्युझिअम पाहण्यास काहीही प्रवेशफी घेत नाहीत मात्र मोठ्या माणसाला ५५ सेंट्स् फी पडते.

हे म्युझिअम पाहून आम्ही थक्क झालो. मानवी मनाच्या कल्पकतेची व परिश्रमांची कमाल वाटली. संग्रहालयाच्या एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीकडे जात असताना आपल्याला अमेरिका १८३० सालापासून कशी बदलत गेली हे पाहावयास मिळते. १८३० साली उपयोगात असणारी घोड्याची गाडी बघावयास मिळते. १८३० साली चालू असणारी जिप्सी वॅगन आता कुठेही पाहायला मिळत नाही. या संग्रहालयात असणारी ही चार चाकांची बंद गाडी फ्रान्समधून आणावी लागली. आपल्याला वाइल्ड वेस्ट विषयक अमेरिकन चित्रपटात ती पहावयास मिळते. त्यानंतर बदलत गेलेली वाहने ठेवलेली आहेत. त्यात दूर प्रवास करणाऱ्या घोड्यांच्या गाड्या (स्टेज कोचेस), १८९० साली रॉकफेलरने वापरलेल्या तेलाच्या गाड्या, १९२९ नंतरच्या ऑम्निबसेस्. १९१५ साली वापरलेली फोर्ड स्टेशन वॅगन, वाफेवर चालणारे आगगाडीचे एंजिन यांचा समावेश होतो. ही वाहने अमेरिकेतील वाहनांचा इतिहास बोलका करतात. १८३० सालचे डॉक्टरांचे दवाखाने आता किती साधे वाटतात! याशिवाय जुन्या काळापासून बदलत गेलेली न्हाव्यांची दुकाने, औषधालये, छापखाने, विणकऱ्यांचे माग, स्वयंपाकघरात सूत कातून कापड विणणारी गृहिणी यांचेही दर्शन होते. घरांच्या नमुन्यात स्वयंपाकघरे पाहण्यासारखी आहेत. १८६०, १८९०, १९१०,

१९३० या काळातील स्वयंपाकघरे पाहिल्यावर अमेरिकन् गृहिणींना कशी हळूहळू निरनिराळ्या यांत्रिक साधनांनी सुसज्ज अशी स्वयंपाकघरे मिळाली याची कल्पना येते. १८६९ साली वापरलेली लाकडाची खोली (लॉग् केबिन्) बघायला मिळते. त्या केबिनमध्ये राहात. संरक्षणासाठी सभोवती भिंती बांधलेल्या असत. याशिवाय १८८४ सालचे ल्युथेरिअन् चर्च येथे पाहावयास मिळतो. या चर्चमध्ये शाळाही भरत असे. पहिली वसाहत करणारे लोक या चर्चमध्येच जमत व त्याचा हॉलसारखा उपयोग करीत. १८७४ सालची मुलकी कचेरी, १८७८ सालची वस्तुभांडारे (जनरल स्टोअर्स) पाहायला मिळतात. पहिली अमेरिकन् यंत्रे जड व ओबडधोबड होती. त्याकाळचे ट्रॅक्टर्स पाहून गंमत वाटली.

हे पायोनिअर व्हिलेज् पाहिल्यावर आपल्याला कल्पना येते की अमेरिकन् वसाहत करणारांना अमेरिकेच्या अरण्यवत् व रानटी अवस्थेतील भूमीला आजच्या पदाला आणून पोचवण्यासाठी किती परिश्रम करावे लागले. अमेरिकेच्या विकासात ज्या काही थोर अमेरिकनांनी भर घातली त्यात जॉन डी. रॉकफेलर यांचे नाव प्रथम घेतले पाहिजे. रॉकफेलरने तेलाच्या खाणींचा शोध घेऊन तो धंदा इतका भरभराटीला आणला की लोक त्याला 'तेलाचा राजा' (ऑईल किंग) म्हणू लागले. पण त्याची राहणी अत्यंत साधी होती. त्याने मिळवलेली अपार संपत्ती ५३०,०००,००० डॉलर्स जगातील परोपकारी कार्यांना देऊन टाकली. आज अमेरिकेत त्याच्या नावाची अनेक स्मृतिप्रतिष्ठाने, स्मारके, अनुदाने यांच्या रूपाने गाजत आहेत. स्कॉटलंडमध्ये जन्मलेला कार्नेजी हा दुसरा एक उदारधी - १८३५ साली तो

अमेरिकेत आला व १८९२ मध्ये 'पोलादाचा राजा' म्हणून प्रख्यात झाला. त्याने आपली कोट्यवधी डॉलर्सची संपत्ती दान करून टाकली आपल्या कुटुंबाला हयातीपर्यंत पुरेल एवढेच उत्पन्न त्याने मागे ठेवले.

अमेरिकेचा विकास करणाऱ्या उद्योगपतीविषयी असे कौतुकाचे विचार मनात आले. पायोनिअर व्हिलेज् पाहून झाले व आम्ही आमच्या मोटारीत बसून पुढील प्रवासास सुरुवात केली. दुपारच्या जेवणाची वेळ झाली. आम्ही एका पिक्निक् स्पॉटपाशी थांबलो व बरोबर आणलेले भोजन केले. जेवण झाल्यावर आम्ही परत अमेरिकेच्या त्या राजेशाही, रुंद रस्त्यावरून वेगाने प्रवास करू लागलो. वाटेत वाहतूक फार थोडी असल्याने आम्हाला गाडीचा वेग कमी करण्याची जरूरी पडत नसे. काही तासातच आम्ही नेब्रास्का स्टेटमधून वायोमिंग स्टेटमधे प्रवेश केला. वायोनिंग हे इंडिअन नाव असून त्याचा अर्थ 'आलटून पालटून डोंगर व दऱ्या' असा आहे. या प्रांताचे वैशिष्ट्य म्हणजे उंच पर्वत, विरळ वस्ती, बर्फाच्छादित शिखरे व घनघोर युद्धे. १८६७ पूर्वी या प्रांतात अवघे १००० लोक राहत असत. या प्रांतात त्यावेळी रेड् इंडिअन लोकांचे राज्य होते. या लोकांनी परक्या गोऱ्या वसाहतवाल्यांशी जोरदार लढाया दिल्या. युनिअन पॅसिफिक रेल्वे बनविणे चालू असता या इंडिअन लोकांनी तिच्यावर हल्ले केले. या लढायात क्रेझी हॉर्स, सिटिंग बुल् यांच्या सारख्या शूर इंडिअन योद्ध्यांनी रोझबड् व लिटिल् बिग् हॉर्न या ठिकाणी १८७६ च्या सुमारास लढाया केल्या. पण इंडिअन लोकांकडे शस्त्रास्त्रे व अन्नपुरवठा यांचा तुटवडा असल्याने अखेरीस त्यांना गोऱ्या

लोकांपुढे माघार घ्यावी लागली. १८८० साली हे शूर व एकेकाळचे जमिनीचे मालक असणारे लोक रिझर्व्हेशन्समध्ये कोंडले गेले.

अजूनही या प्रांतात मनुष्यवस्तीपेक्षा गुरांची व मेंढरांची वस्ती दसपट आहे. १९७० साली येथील लोकवस्ती ३३२४१६ एवढी होती. पन्नास-शंभर मैल गेल्यावर एखादे शेतकऱ्याचे घर दिसते. वायोमिंगमधून जात असता आम्हाला या प्रांताची भव्यता, शांतता व एकाकीपणा यांची प्रचीती आली. संध्याकाळी आम्ही फोर्ट लॅरेमी या ऐतिहासिक स्थळी पोचलो. लॅरेमी व नॉर्थ प्लॅट या नद्यांच्या संगमाजवळ हा जुना किल्ला प्रथम १८३४ साली बांधण्यात आला. आज हा किल्ला एकटेपणाने उभा असल्यासारखा दिसतो. पण या ऐतिहासिक स्थळीच संख्येने थोड्या असलेल्या अमेरिकेन लोकांनी संख्येने प्रबळ असलेल्या रेड इंडिअन लोकांशी टक्कर दिली व अमेरिकन राष्ट्राचा पाया भक्कम केला.

१८३४ साली या भागात बीव्हर ही जनावरे विपुल होती. त्यांना मारून त्यांची लोकर विकणे हा किफायतशीर धंदा होता. सू, शेणे व अराफी जातीचे रेड इंडिअन लोक येथे येऊन बीव्हरची फर व कातडी विकत व तंबाखू, व्हिस्की व मणी विकत घेत. काही वर्षांनी फरचा व्यापार मंदावला पण कॅलिफोर्नियातील सोन्याच्या आशेने जाणारे शेकडो लोक आपल्या चार चाकी सामानाच्या गाड्या (वॅगन्स) येथे थांबवू लागले. १८४९ साली अमेरिकन सरकारने येथे लष्करी ठाणे केले. इंडिअन लोकांच्या हल्ल्यापासून गोऱ्या लोकांना संरक्षण देण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग होऊ

लागला. १८५१ व १८६८ साली अखेरीस फोर्ट लॅरेमी येथे इंडिअन लोकांनी तह केले व लोकांची युद्धे कमी झाल्यावर सैनिक येथून निघून गेले. सर्व इमारती रिकाम्या पडल्या. ५० वर्षे त्या तशाच पडून होत्या. १९३८ साली प्रेसिडेंटच्या हुकूमान्वये फेडरल सरकारने आसपासची २१४ एकर जमीन विकत घेतली व फोर्ट लॅरेमी हे एक ऐतिहासिक स्मारक म्हणून स्थापन केले.

१८४९ सालापासून असणाऱ्या २१ इमारती या ठिकाणी, पूर्वी ज्या स्थितीत होत्या तशाच पाहावयास मिळतात त्यातील काही जुन्या-होत्या तशाच आहेत. इतरांची डागडुजी करून त्या काळातील अस्सलपणा आणण्याचा प्रयत्न केलेला आहे एका इमारतीत १८७६ साली असणारे व्यापारी ठाणे जसे त्यावेळी होते तसेच बघावयास मिळते. व्यापारी मालात हत्यारे, (टूल्स), शस्त्रे, कापड, घरात लागणाऱ्या वस्तू यांचा साठा आढळतो. त्यात रेड इंडिअन लोकांनी मारलेली बीव्हर व बफेलो यांची कातडी, बीव्हरची लोकर बघावयास मिळतात. ह्या वस्तू रेड इंडिअन लोक या ठिकाणी त्या काळात विकावयास आणीत असत. दुसऱ्या एका इमारतीत त्या काळातील उपाहारगृह व मदिरागृह (बार) पाहावयास मिळतात. येथे बिअर, वाईन, व्हिस्की, शँपेन् एल. ब्रँडी वगैरे तऱ्हतऱ्हेची मद्ये ठेवीत. एका इमारतीत १८८८ साली लेफ्टनंट कर्नल अँड्रू बर्ट व त्यांचे कुटुंबिय राहत असत. व्हिक्टोरिअन पद्धतीने सजविलेले हे घर पाहिले असता त्या काळातील लष्करी अधिकाऱ्याची राहणी कशी असेल याची कल्पना येते. दुसऱ्या एका इमारतीत १८७५ साली सर्जन व त्याचे कुटुंब राहत असलेले घर जसेच्या तसे पाहावयास मिळते.

याशिवाय १८५२ ते १८६८ या काळातील लष्करी अधिकाऱ्यांची राहण्याची ठिकाणे, अविवाहित अधिकाऱ्यांची निवासस्थाने आहेत. लष्करी अधिकाऱ्यांचा क्लब, १८८४ सालचे पोस्टकमांडरचे ऑफिस त्याकाळी होते तसे पाहावयास मिळते. दूरवर पसरलेला हा परिसर व त्यातील निरनिराळ्या इमारती पाहिल्यावर आपण पुन्हा १८४९ ते १८८३ च्या कालखंडांत गेल्याचा भास होतो. माझ्या मनात विचार आला की, ह्या लोकांनी आपल्या छोट्या २०० वर्षांच्या इतिहासाची किती स्मारके करून ठेवली आहेत! आमच्या भारताचा इतिहास दोन हजार वर्षांचा पण अत्यंत प्राचीन व मौल्यवान अशी ऐतिहासिक स्थळेही आम्हांला पैशाच्या अभावी जतन करणे कठीण पडते.

□□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास / 23
ग्रा. क्र. २६५५८
१३/७/९९
ग्रंथ संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# २

फोर्ट लॅरॅमीचा परिसर बराच विस्तृत आहे. त्यामुळे सर्व ठिकाणे पाहिल्यावर आम्ही बरेच रमलो. आम्ही मोटारीत बसलो व मोटार वायोमिंगच्या रमणीय परिसरातून जाऊ लागली. काही वेळाने आम्ही गर्सनी या ठिकाणी जेवायला थांबलो त्या ठिकाणी आम्हांला एक फारच गमतीदार अनुभव आला. आम्ही एका टेबलापाशी जेवायला बसलो. इतक्यात

पलीकडून एक मेक्सिकन रेड इंडिअन आमच्याजवळ आला. आम्हाला जवळून न्याहाळत त्याने विचारले, 'मी तुमच्याबरोबर जेवायला बसू का?' आम्ही आनंदाने त्याला संमती दिली. त्याचा वर्ण भारतीयांसारखा होता. केस काळेभोर होते. तो इंग्रजी चांगले बोलत होता. माझ्याकडे पाहून तो म्हणाला, 'मी प्रथमच खरीखुरी भारतीय स्त्री पाहात आहे.' माझ्या पेहेरावाकडे त्याने कौतुकाने पाहिले.

'आज माझा पगार झाला आहे. माझं कुटुंब लांब राहातं. आज तुम्ही भेटल्यानं कुटुंबियांना भेटल्याचा आनंद झाला.' त्याला मद्य जरा जास्त चढल्यासारखे दिसत होते.

'तुम्ही कुठे काम करता?' दिलीपने विचारले.

'मी कोळशाच्या खाणीत काम करतो.' तो उत्तरला. वायोमिंग हा प्रांत रमणीय व डोंगराळ असला तरी तेथे युनेनियम्, तेल व कोळसा यांच्या खाणीही आहेत. जगातील कोळशाच्या मोठ्या खाणीपैकी काही खाणी या प्रदेशात आहेत.

'ज्यांच्यापासून आम्हाला इंडिअन हे नाव मिळालं ते खरेखुरे इंडिअन लोक मला कधी भेटले असते? तुम्ही भेटलात म्हणून माझी आकांक्षा पुरी झाली. आता भारतात जाण्याचा योग आला नाही तरी मला तितकंसं वाईट वाटणार नाही.'

त्याच्याशी गप्पागोष्टी करताकरता आमचे जेवण बरेच लांबले. जाताना आम्ही बिल द्यायला लागलो. पण तो ऐकेना. तो म्हणाला, 'एवढा तरी आनंद मला नाकारू नका. मी तुम्हाला घरीच जेवायला घेऊन गेलो असतो. पण माझं घर फार दूर आहे.' आम्ही काउंटरपाशी बसलेल्या बिल वसूल करणाऱ्या बाईला

आमच्याकडून पैसे घ्यायचा आग्रह केला. पण हा इंडिअन तिला म्हणाला, 'हे पहा, मी तुमचं नेहेमीचं गिऱ्हाईक आहे. माझं तुम्ही ऐकलंच पाहिजे. जर तुम्ही माझ्याकडून पैसे घेतले नाहीत तर मी पुन्हा तुमच्या उपाहारगृहात पाऊल टाकणार नाही.'

ती काउंटरवरील स्त्रीही आमच्याकडून बिल घेईना. आमचा अगदी नाइलाज झाला. उपाहारगृहाबाहेर आल्यावर आम्ही त्याचे पुन्हा पुन्हा आभार मानले. त्याच्या आतिथ्याची परतफेड आम्ही कधीही करू शकणार नाही याचे आम्हाला वाईट वाटले. त्यावर तो म्हणाला, 'तुम्ही माझ्यासाठी एक गोष्ट करा. तुम्ही भारतात गेल्यावर मला तेथून एक पत्र धाडा. हे पहा माझं नाव आणि पत्ता.' त्याने तो आपल्या हस्ताक्षरात लिहून दिला. तो मी जपून ठेवला आहे. तो असा होता.

'Buddy Buend, P. O. 361, Guernsey, Wyoming 82214.' आम्ही भारतात परत आल्यावर लगेच त्याला एक पत्र पाठवले. ते अस्सल भारतीयाचे भारतातून आलेले पत्र म्हणून त्याने जपून ठेवले असेल!

मोटारमध्ये बसल्यावर डॉ. वॉकर म्हणाले, 'हे रेड इंडिअन लोक अतिशय प्रेमळ, आतिथ्यशील आणि उदार असतात. मनाने फार भावनाप्रधान असतात. दारूचे मात्र त्यांना जबरदस्त आकर्षण असते. या रेड इंडिअन माणसाचे आदरातिथ्य पाहून मला आम्हा गोऱ्या अमेरिकनांची लाज वाटू लागली आहे. चला, मी तुम्हाला निदान चॉकोलेट तरी देतो.'

डॉ. वॉकर को कॉलेजच्या उन्हाळ्याच्या सुट्टीतील एका प्रकल्पाच्या कामानिमित्त विद्यार्थ्यांबरोबर ॲरिझोना स्टेटमधील

नयाज जातीच्या इंडिअन लोकांबरोबर व मेक्सिओतील ओटानी इंडिअनांबरोबर राहिलेले होते. त्यामुळे त्यांना इंडिअन लोकांची चांगली माहिती होती. भारतीयांप्रमाणे रेड् इंडिअन लोकांविषयीही त्यांना आकर्षण वाटत असे.

या प्रसंगावरून परदेशातील लोकांत विशेषत: रेड इंडिअन लोकांत भारतीयांविषयी किती सद्‌भावना आहेत असा विचार माझ्या मनात आला, परदेशात राहणाऱ्या भारतीयांनी या भावनांचे संवर्धन करण्याची आपलीही जबाबदारी ओळखली पाहिजे असे मला वाटले.

ह्यानंतर आम्ही रुंद आखणीच्या व गुळगुळीत रस्त्यावरून वेगाने प्रवास चालू केला. आता निसर्गाचे स्वरूप पालटू लागले. डोंगर जवळ आले, तळी दिसू लागली. दूरवर पसरलेल्या हिरव्यागार मैदानांवर हरणांचे कळप दृष्टिपथात येऊ लागले. वायोमिंग हे शिकाऱ्यांचे नंदनवन आहे. कारण या शांत, विरळ वस्तीच्या प्रदेशात नाना तऱ्हेची जनावरे निर्भयतेने हिंडताना दिसतात. मूस, एल्क, अँटिलोब, डीअर या जातींची लहानमोठी हरणे, लांब शिंगांची मेंढरे, डोंगरी बकरे, तपकिरी रंगाची अस्वले, असे नानाविध प्राणी शिकाऱ्याला येथे सहज मिळतात. वायोमिंग प्रांत हा निसर्गाने वन्यपशूंचा राखीव प्रांत म्हणूनच निर्माण केला आहे असे म्हणावयास हरकत नाही. अमेरिकेतील शहरात राहणाऱ्यांना या प्रदेशातील शांततेची व नैसर्गिक सौंदर्याची कल्पना कधीच येणार नाही.

रात्री आम्ही कॅस्पर या शहरात पोचलो. हे शहर नॉर्थ प्लॅट या नदीवर बसलेले आहे. त्याच्या नैसर्गिक सौंदर्यामुळे ते हौशी

प्रवाशांचे आवडते स्थान बनले आहे. येथे इतर प्रांतातील लोक शिकार करण्यासाठी येतात. तळ्यातून बोटिंग, मासे पकडणे, पोहोणे असे विविध खेळ चालू असतात. अमेरिकेतील पुष्कळशा शहरांप्रमाणे हे शहरही नैसर्गिक सौंदर्याबरोबर उद्योगधंद्यातही आघाडीवर आहे. लोकर, खनिज तेल, युरेनियम व कोळसा यांच्या वैपुल्याने हे शहर समृद्ध झाले आहे. १९७० साली या शहराची वस्ती ४८००० होती. पण या वस्तीसाठी ४६ चर्चेस, ३ वाचनालये, २६ शाळा, एक विद्यापीठ व एक प्लॅनेटेरियमही आहे. कॅस्पर शहरात राहणाऱ्या माणसाला हरणारची शिकार करावयास २ मैलांपेक्षा जास्त दूर जाण्याची जरूरी नाही. ५ मैलांच्या परिसरात त्याला पाखरांची शिकार करावयाला मिळते. मोटारीतून एका तासाच्या अंतरावर त्याला टर्की, मॅलँर्ड, डक्स अशी पाखरे मारून त्यांचे रुचकर पदार्थ त्याच दिवशीच्या जेवणासाठी बनवता येतात. वायोमिंगमध्ये राहणारे लोक आपल्या प्रांतातील दूरवर जाणाऱ्या गुळगुळीत रस्त्यांवरून १००-१५० मैलांवर होणाऱ्या फूटबॉल किंवा बास्केटबॉलचे सामने पहावयास जाताना दिसतात.

वायोमिंग प्रांतात प्रथम आगगाडी सुरू झाली व हा प्रांत गुरे व मेंढरे यांच्यामध्ये अग्रगण्य झाला. कारण या प्रांतातील कुरणात उगवणारे छोटे, हिरवेगार गवत गुरांना फार आवडते. पण त्यानंतर या प्रांतात तेल, पेट्रोल, ट्रोना (त्याच्यापासून सोडियम ॲश हे रसायन मिळते) यांच्या खाणी सापडल्या. कोळसा, युरेनयिमं यांच्या खाणींची जोड होतीच. त्यामुळे गुरांच्या धंद्यापेक्षा आता नवीन धंदे अधिक किफायतशीर वाटू लागले.

इतकी खनिज संपत्ती असताना या प्रांतात कारखाने व उद्योगधंदे सुरू व्हायला हवे होते. गजबजलेली शहरे व संपत्तीचा धूर निघण्याची अपेक्षा असावयाची. पण वायोमिंगच्या लोकांना त्यांचा निर्जन, शांत प्रकृतीचा निसर्ग अधिक प्रिय आहे. शिवाय या विस्तीर्ण प्रदेशात तयार झालेल्या मालाची वाहतूकही गजबजलेली शहरे, त्यातील अठरापगड वस्ती, त्याबरोबर उत्पन्न होणाऱ्या गलिच्छ वस्त्या यांचे विशेष आकर्षण वाटत नाही. आपली खनिज संपत्ती ते अमेरिकेतील इतर प्रदेशांना विकतात व स्वत: अधिक द्रव्यलोभाला बळी न पडता समाधानाने आपल्या शांत, निसर्गरम्य प्रांतात संथपणे जीवन घालवतात. त्यामुळे कित्येक लोक वायोमिंगचे 'आपल्या नैसर्गिक संपत्तीची परप्रांतियांना लूट करू देणारी अमेरिकेतील एक वसाहत' असे वर्णन करतात. वायोमिंगचे नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना या प्रांताकडे आकर्षित करते. पर्यटनाचे मात्र येथील लोकांना कारखान्यासारखे वावडे नाही. कारण पर्यटनव्यवसायाने त्यांच्या प्रदेशाचे सौंदर्य किंचितही कमी न होता ते अधिकच मोहक व आकर्षक दिसावे असा प्रयत्न चालू राहतो. या पर्यटन व्यवसायावर दरवर्षी या प्रांतात १५ कोटी डॉलर्स एवढे उत्पन्न मिळते.

कॅस्परला पोहचल्यावर डॉ. वॉकर हे आपल्या एका स्नेह्याकडे राहावयास गेले. आम्ही एका मॉटेलमध्ये राहिलो. तेथे एक सुसज्ज खोली आम्हाला १५ डॉलर्सना मिळाली. आम्ही पायोनिअर व्हिलेज, फोर्ट लॅरमी पाहून दमलो होतो. त्यामुळे पलंगावर पडताच झोप लागली.

सकाळी आठ वाजता डॉ. वॉकर मॉटेलमध्ये येऊन

दाखल झाले. आम्ही एका रेस्टोराँमध्ये जाऊन चहा व ब्रेकफास्ट घेतला व मोटारीतून पुढच्या प्रवासास सुरुवात केली. कॅस्पर शहर सोडून आम्ही ईशान्येच्या रस्त्याने जाऊ लागलो. आता मोटरच्या दोन्ही बाजूंनी जवळ जवळ निर्मनुष्य प्रदेश दिसू लागला. वाहनेसुद्धा अगदी क्वचितच दिसत. डोंगर दूरवर दिसत होते. मधूनच काही हरणांचे थवे धावताना दिसत. आता आजूबाजूला इंडिअन रिझर्व्हेशन्स पसरलेली होती. एखादा तरी रेड इंडिअन दृष्टिपथात येईल अशी मला आशा होती. डॉ. वॉकरना माझी ही इच्छा मी बोलून दाखवली. ते म्हणाले, रिझर्व्हेशन्स रस्त्यापासून आत लांब आहेत रेड इंडिअन लोकांच्या मालकीची ही शेतीची जमीन आहे.'

'पण मग जे शेती करताना नाही दिसत?' मी विचारले.

डॉ. वॉकर उत्तरले, 'रेड इंडिअन लोकांना शिकार करायला आवडते. शेती करणे त्यांच्या स्वभावास रुचत नाही. आपली जमीन ते गोऱ्या शेतकऱ्यांना खंडाने देतात.'

आज अमेरिकन शेतकरी एवढे श्रीमंत आहेत. परदेशातील इतर लोकही आज अमेरिकेत येऊन आपले भविष्य उजळतात. एकेकाळी गुलाम असणारे निग्रो लोकही आज अमेरिकेच्या सुधारलेल्या व संपन्न परिस्थितीचा उपयोग करून घेत आहेत. असे असताना येथील मूळचे मालक शूर इंडिअन लोक मात्र या जीवनप्रवाहापासून दूर राहतात याचे मला वाईट वाटले. याच संबंधात पूर्वी माझ्या वाचनात आलेल्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाची आठवण झाली. हे लोक बदलायला तयार नाहीत. दारूच्या व्यसनाने त्यांचा नाश झाला आहे कोणी

म्हणतात की गोऱ्या लोकांनी त्यांचा नायनाट केला व त्यांना रिझर्व्हेशन्समध्ये बंदिस्त करून टाकले आहे. या गुंतागुंतीच्या प्रश्नात खोलवर न शिरता एवढे मात्र नमूद केले पाहिजे की या इंडिअन लोकांबद्दल आम्हाला वाईट वाटले. गर्सनीला भेटलेल्या स्नेहाकांक्षी निर्मळ मनाच्या इंडिअन माणसाने आमच्या मनावर इंडिअन लोकांच्या उदार, भावनाप्रधान स्वभावाचे कधी पुसले न जाणारे चित्र उमटवले होते.

हा प्रांत जरी निर्जन असला तरी रस्ते इतर कोणत्याही अमेरिकन रस्त्याइतकेच प्रशस्त व गुळगुळीत होते.

'यलोस्टोन पार्कच्या पर्वताचे तर अजून दर्शनही नाही.' मी डॉ. वॉकरना म्हटले.

ते म्हणाले, 'हे पहा ड्यू बॉइ गाव आले. हे रानटी पश्चिमेची शीव म्हणून प्रसिद्ध आहे. येथून पुढे आता निसर्गाचे स्वरूप बदलेल.' आपण वाईल्ड वेस्टची चित्रे सिनेमातून पाहिलेली आहेत. मारामारी करण्यास सदैव तयार असणाऱ्या तेथील धाडसी व भांडखोर हल्लेखोरांची आपणास ओळख असते. ड्यू बॉइला पोचताच आपण एकदम शहरापासून दूर अशा अविकसित भागात आल्याची प्रचीती आली. एका बसमध्ये आम्हाला बरेचसे रेड इंडिअन लोक दिसले. त्यांचे काळे केस, लालसर तपकिरी वर्ण व ताठ शरीरयष्टी वैशिष्ट्यपूर्ण वाटली. अर्थातच हे इंडिअन लोक अंग रंगवलेले, पिसे लावलेले, चित्रातल्या रेड इंडिअनांसारखे नसून कोणत्याही अमेरिकन माणसासारखे विजार, शर्ट, बूट घातलेले होते. ड्यू बॉइ हे शहर ६९१७ फूट उंचीवर वसलेले आहे. आम्ही एका रेस्टोराँमध्ये

जेवायला गेलो. तेथे त्या प्रांतातील रहिवासी व काही हौशी प्रवासी दिसले. जेवण होताच आम्ही समोरच असणाऱ्या वस्तुभांडारात प्रवेश केला. तेथे वाइल्ड वेस्टमधील जीवनाविषयी प्रसिद्ध अशी हत्यारे, कपडे, टोप्या, टाय्, गळपट्टे वगैरे वस्तू ठेवलेल्या होत्या.

तेथून आम्ही मोटारीत बसलो व प्रवासाला सुरुवात केली. आता मात्र एकदम निसर्ग उंचउंच हिमाच्छादित पर्वत, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पसरलेली पाईन व फर वृक्षांची जंगले यांच्यामधून आमचा रस्ता अंतर कापू लागला. मध्येच एखादी नदी दिसे. दिलीपने दुकानात विकत घेतलेला या भागातील खास वैशिष्ट्यपूर्ण शर्ट व हॅट हा पोषाख परिधान केला होता. त्याची व माझी या रमणीय रस्त्यावरील छायाचित्रे डॉ. वॉकरनी घेतली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बर्फाचे गालिचे पसरलेले होते. या रस्त्यावरून जाताना आम्हाला आपण हिमालयातील प्रदेशात तर आलो नाहीना असे वाटू लागले.

लवकरच आम्ही यलोस्टोन पार्कपाशी पोचलो. या पार्कला एकंदर पाच प्रवेशद्वारे आहेत. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम व आग्नेय अशा पाच दिशांनी येण्यास निरनिराळी प्रवेशद्वारे आहेत. आम्ही पश्चिमेकडील प्रवेशद्वाराने पार्कमध्ये प्रवेश केला. प्रवेशद्वारापाशी गाडी थांबवावी लागली. पहाऱ्यावरील युनिफॉर्ममधील तपासनीसांनी आमचे पासपोर्टस् पाहिले. आम्ही परदेशातून आलेले असल्यामुळे आम्हाला प्रवेशशुल्क कमी पडले. परदेशी प्रवाशांना सवलती देण्याची ही योजना आपणही विचारात घेण्यासारखी आहे. परदेशी प्रवाशांना लुटण्यापेक्षा उलट त्यांना अमेरिका पाहण्याची संधी मिळावी, त्यांचा प्रवास सुखाचा,

कमी खर्चाचा व्हावा व अमेरिकेविषयी हौशी परदेशी प्रवाशांना आकर्षण वाटावे म्हणून केवढी ही तत्परता!

यलोस्टोन पार्कमध्ये प्रवेश केल्यावर थोड्याच अंतरावर प्रवाशांसाठी राखून ठेवलेली एक शिबिराची जागा (कँपिंग ग्राऊंड) दिसत होती. तेथे कित्येक मोटारगाड्या जोडडब्यासह उभ्या होत्या. या जोडडब्यात (ट्रेलर) स्वयंपाकघर, जेवणघर, दिवाणखाना, शय्यागृह अशी सर्व व्यवस्था होती. कित्येक लोक असा जोड - डबा खरेदी करून तो मोटारला जोडतात व कोणत्याही आवडीच्या रम्यस्थळी अशा कँपिंग ग्राउंडमध्ये उभा करतात. याठिकाणी पाणी वगैरे मिळण्याची सोय उपलब्ध असते. डॉ. वॉकर यांचे हेस्टिंग्ज येथे राहणारे बंधू अशाच एका ट्रेलरमध्ये बसून सुटीला गेले होते. या ट्रेलरमध्ये कुटुंबाला १४ दिवस राहाता येत होते.

यलोस्टोन पार्क हे जगातील पहिले 'नॅशनल पार्क' आहे. त्याची स्थापना १ मार्च १८७२ साली झाली. हे पार्क वायोमिंग स्टेटच्या ईशान्य (नॉर्थ - वेस्ट) कोपऱ्यात वसलेले आहे. पण त्याचा विस्तार ३४०० चौरस मैल असल्यामुळे उत्तर व पश्चिम दिशांना ते मॉंटेना या संस्थानात पसरलेले आहे. पश्चिमेला काही भाग इडाहो या संस्थानात घुसलेला आहे. पार्कच्या मध्यभागी एक जुन्या ज्वालामुखीचे पठार असून त्याची उंची ८००० फूट आहे. या पठाराच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व आग्नेय या दिशांना पर्वतांच्या रांगा उभ्या आहेत. त्यांची उंची या पठारापेक्षा आणखी २००० ते ४००० फूट जास्त आहे.

उन्हाळ्यात या उद्यानातील तपमान ५० ते ७० अंश

फॅरनहाईट असते. परंतु कोणत्याही वेळी ते गोठण्याइतके खाली जाते.

या विस्तीर्ण उद्यानात ५०० मैल लांबीचे मोटरचे रस्ते आहेत. या रस्त्यांवरून ५० मैल पेक्षा जास्त वेगाने मोटर चालत्तता येत नाही. याशिवाय मुख्य रस्त्यापासून अंतर्भागात जाण्यासाठी १००० मैल लांबीचे पायरस्ते (ट्रेलस्) आहेत. या पायवाटा उंच, खोल, खडकाळ, अरण्यवत् अशा भागातून जातात. पण प्रत्येक पायवाटेच्या सुरुवातीला तिची लांबी, पोचण्याचे ठिकाण, दिशा यांची माहिती देणारे फलक लावलेले आहेत.

आम्ही 'ओल्ड फेथफुल इन' या ठिकाणी आमची मोटार थांबवली. त्यावेळी संध्याकाळ झालेली होती. हे हॉटेल पाहताच मन प्रसन्न झाले. हॉटेलचे लाकूडकाम अगदी जुन्या पद्धतीचे व आकर्षक वाटले. हे हॉटेल जगातील सर्वात जुने, संपूर्णतया लाकडाचे बनविलेले असे हॉटेल आहे. ते १९०३-१९०४ साली बांधले गेले. प्रथम तेथे १२० खोल्या होत्या. आता खोल्यांची संख्या ६५० आहे. खांब, तुळया यांचे लाकूड सर्व यलोस्टोन पार्कमध्ये असणाऱ्या जंगलातून घेतलेले आहे. फायरप्लेस ८५ फूट लांबीची असून पाच मैलांवर असणाऱ्या खडकातून आणलेल्या दगडाची बनवलेली आहे. नोकरवर्गाची संख्या २५० असून त्यातील बहुतेक विद्यापीठातील विद्यार्थी असतात. ते सुट्टीमध्ये येऊन कामे करतात. त्यांना शहरापासून दूर व आल्हाददायक हवामानात राहावयास मिळते. कामापासून सुट्टी असेल त्यादिवशी उद्यानातील प्रेक्षणीय स्थळे पाहायला जाता येते. पायवाटांनी मनसोक्त हिंडता येते. पालक जरी श्रीमंत असले

तरी बरेच अमेरिकन विद्यार्थी आपल्या पायावर उभे राहून आपले शिक्षण करतात. कोणतेही काम कमी लेखायचे नाही अशी समाजरचना असल्याने अशा रमणीय ठिकाणच्या हॉटेलमध्ये कामे करण्यास विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थिनी उत्सुक असतात. या हॉटेलात दरवर्षी साधारणत: ५०,००० प्रवासी येतात.

मुख्य दाराने हॉटेलात प्रवेश करताच आतील लाउंजमध्ये अनेक हौशी, सुटीच्या रंगीबेरंगी पोषाखातील स्त्रीपुरुषांचे थवे व्हिक्टोरिअन पद्धतीच्या कोचांवर आरामखुर्च्यांवर बसलेले आढळले. काही लोक बाजूच्या 'गिफ्ट शॉप'मध्ये खरेदी करीत होते. या दुकानात रेड इंडिअन लोकांनी हाताने केलेल्या अनेक वस्तू होत्या. त्यात रंगीत मण्यांच्या माळाही होत्या. त्यातील काही आम्ही विकत घेतल्या. यलोस्टोन पार्कमधील निरनिराळ्या प्रेक्षणीय देखाव्यांची चित्रकार्डेही आम्हाला आकर्षक वाटली. याशिवाय तेथे यलोस्टोन पार्कबद्दल माहिती देणारी पुस्तके, वर्तमानपत्रे व मासिकेही आढळली. हॉटेलला जोडूनच एक ब्यूटी पार्लर, केशकर्तनालय व वैद्यकीय उपचारांचे केंद्र आहे. तेथे एक नर्स किंवा डॉक्टर मदतीस तत्पर असतो.

आम्हाला या हॉटेलमध्ये एक खोली मिळाली. ती प्रशस्त असून ग्रामीण पद्धतीने सजविलेली होती. त्यामुळे ती तेथल्या वातावरणात योग्य वाटली. जोडूनच जेवणाची व चहाफराळाची व्यवस्था होती. पण हॉटेलमध्ये राहणारांनी तेथेच चहा, भोजन करावे अशी सक्ती नसते. जवळच खाद्यपदार्थ, चहा, कॉफी देणारे एक उपाहारगृह होते. आम्ही तेथे जाऊन चहा घेतला व नंतर

भोजनही केले.

या हॉटेलच्या बाहेरच ओल्ड फेथफुल नावाचा गरम पाण्याचा झरा आहे. ह्या झऱ्यावरूनच या हॉटेलला त्याचे नाव मिळाले आहे. हा झरा जगप्रसिद्ध आहे. हजारो प्रवाशांनी त्याची छायाचित्रे घेतली असतील. हा गरम झरा म्हणजे निसर्गातील एक विलक्षण देदीप्यमान आश्चर्य आहे. १८७० या झऱ्यास हे नाव मिळाले. कारण तो अगदी एखाद्या इमानी नोकराप्रमाणे ठराविक वेळेला आपले काम बजावतो. एक तास व काही मिनिटांच्या अंतराने भूगर्भातून येणाऱ्या गरम पाण्याचे कारंजे उफाळते. आम्ही गेलो तेव्हा बरेचसे लोक या झऱ्याच्या बाजूच्या कट्ट्यावर बसलेले आढळले. कारण कारंजे उफाळण्याची वेळ होत आली होती. या कारंज्याची उंची १५० फूट किंवा अधिक असते. एखाद्या दारूच्या नळ्यासारखा हा झरा गरम पाण्याचे फवारे उंचउंच बाहेर सोडतो व पुन्हा काही वेळाने थंड होतो. हा विलक्षण झरा पाहून आम्ही थक्क झालो. संध्याकाळ झाली होती. सर्वत्र धूसर प्रकाश पडला होता. तशा वातावरणात हा उफाळणारा झरा शोभिवंत पण पृथ्वीपासून दूर कुठेतरी असल्याची भावना निर्माण करीत होता. हौशी प्रवासी आसपास असल्याने एकटेपणा जाणवत नव्हता एवढेच.

आसपास सर्वत तऱ्हतऱ्हेचे गरम झरे होते. त्यांच्यातून येणाऱ्या क्षाराने जवळपासची झाडेझुडपेही पांढरी झाल्यासारखी दिसत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी हे सर्व गरम झरे पाहण्याचा आम्ही बेत केला.

# ३

दुसऱ्या दिवशी लवकर उठलो. कारण यलोस्टोन पार्कमध्ये बघावयाची प्रेक्षणीय स्थळे विपुल होती. आम्ही ब्रेकफास्ट घेतला व फेरफटक्याला निघालो. ग्रँड लूप रोडने पार्कमधील बहुतेक गरम झऱ्यांकडे जाता येते. असे एकंदर १०,००० गरम झरे आहेत. त्यातील काही चिखलात बुडालेले असून त्यातून चिखल बुडबुड्यांच्या रूपाने बाहेर पडताना दिसला.

काहीतून वाफ बाहेर येत होती. कित्येक झरे रंगीत आहेत. काही पाचूच्या रंगाचे दिसले. प्रत्येक गरम झऱ्याकडे जायला लाकडी फळ्या तासून व्यवस्थित वाटा केलेल्या आहेत. त्यावरून गेले म्हणजे चिखलाचा किंवा धुळीचा शिंतोडाही उडत नाही. ठिकठिकाणी गरम झरे उसळताना दिसत होते. कासल गेझर हा झरा दर सोळा तासांनी उसळतो. तो १०० फुटापर्यंत उंच जातो व प्रत्येकवेळी २५ ते ३० मिनिटे टिकतो. निसर्गातील हा गणिती नियमितपणा पाहून आश्चर्य वाटले. जंगलात कित्येक ठिकाणी नवखा इसम जर जाऊ लागला तर पायाखालील जमीन खचून जाऊन गरम झऱ्यांत अडकून राहण्याची भीती असते. कित्येक निष्काळजी प्रवाशांना पाय भाजून घेण्याची आपत्ती भोगावी लागली आहे. म्हणून ठिकठिकाणी पाट्या लावल्या आहेत की, सुबक लाकडी वाटांवरून गरम झऱ्यांकडे जाणेच सुरक्षितपणाचे आहे.

'मॅमथ एरिया' या भागात तर रंगीबेरंगी खडकातून वाफा सोडणारे तऱ्हतऱ्हेचे गरम झरे दिसले. कित्येक झरे पाहायला उघड्या बोडक्या टेकड्यांवरून खडकाळ वाटांनी जावे लागते. या टेकड्या निरनिराळ्या आकाराच्या होत्या. काही घुमटाच्या आकाराच्या तर काही एकावर एक पायऱ्यांच्या कपारींच्या रांगा होत्या. कित्येक गरम झरे टेकडीवरून खाली आल्यावर त्यांचे ओढे बनलेले दिसले. इतक्या थंड हवेत हे गरम झरे म्हणजे निसर्गाने माणसाला दिलेला प्रेमाचा दिलासाच आहे. मॅमथ एरियामध्ये अनेक हॉटेले व कॅबिन्स आहेत. मॅमथ मोटर इनमध्ये २५० खोल्या असल्यामुळे त्याठिकाणी सभा, संमेलने,

अधिवेशने, सेमिनार्स भरतात असे समजले. जवळच मॅमथ म्यूझिअम आहे. तेथे यलोस्टोन पार्कचा इतिहास, भूगोल, भूगर्भ, यांशिवाय तेथे राहणारे प्राणी, जीव, वनस्पती यांची संपूर्ण माहिती मिळते. इतर अमेरिकन म्यूझिअमप्रमाणे या म्यूझिअममध्येही तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून या विलक्षण पार्कची हुबेहुब प्रकाशित छायाचित्रेही पाहावयास मिळतात.

या पार्कचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे याच्या विस्तीर्ण प्रदेशात हिंडणारी जंगली जनावरे. ही अगदी जवळून पाहता येतात. मोटारीतून जात असता एखाद्या डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या हिरव्यागार कुरणात ही जनावरे निर्भयपणे चरताना दृष्टीस पडली. आम्ही गाडी थांबवून त्यांची छायाचित्रे घेतली. यलोस्टोन पार्क म्हणजे जगातील वन्य प्राण्यांचे एक प्रचंड प्रदर्शन आहे असे म्हणायला हरकत नाही. यातील कित्येक जनावरे फक्त उत्तर अमेरिकेत किंवा काही थोड्या देशांतच सापडतात. त्यात एकेक जातीची हरणे तर 'ओल्ड फेथफुल' हॉटेलाजवळही हिंडताना दिसतात. या जातीचे हरण रॉकी पर्वतातच सापडते. जगातील सर्वात मोठ्या आकाराच्या हरणांपैकी ही एक जात आहे. मूझ जातीची हरणेही मोठी थोरली असून त्यांचे केस चरचरीत व जाड असतात आणि शिंगे मोठाली व नारळीच्या पानांसारखी दिसतात. कित्येक ६ फूट उंच असून वजनास १८०० पौंडाइतकी भरतात. पुष्कळदा ही हरणे रस्त्यापासून अगदी जवळ हिरव्यागार गवतावर चरताना दिसतात. मात्र या जातीच्या हरणांना फोटो काढलेला आवडत नाही.

डोंगराळ भागात राहणारे उंच लांब शिंगाचे बकरेही

आढळतात. पण या प्राण्यांपेक्षा अधिक रानटी जनावरेही आहेत. उत्तर अमेरिकेत राहाणारे गवे येथे दिसतात. रेड्‌ इंडिअन लोकांना या प्राण्यांची शिकार करणे फार प्रिय असे. येथे अंगावरील लोकरीसाठी प्रसिद्ध असणारे बीव्हरही असतात. आपल्या तीक्ष्ण दातांनी ते झाडे देखील पाडतात, मार्टेन नावाचे दुसरे एक जनावर येथे आढळते. ते रानटी असून त्याला लांब लालसर तपकिरी रंगाची लोकर असते. उत्तर अमेरिकेत आढळणारी पट्टेवाली खारही या प्रदेशात कधी कधी धावताना दिसते. परंतु यलोस्टोन पार्कमध्ये सर्वात भीतिदायक जनावर म्हणजे उत्तर अमेरिकेतच खास आढळणारे करड्या रंगाचे, जंगी आकाराचे अस्वल (ग्रिझल).

या पार्कमध्ये शिकारीची परवानगी नसल्याने या अस्वलांना माणसांची भीती वाटत नाही. कित्येकदा ती माणसाळल्यासारखी व सुस्वभावी वाटतात पण तशा स्वरूपातच ती कित्येकदा भयंकर धोकादायक ठरतात. म्हणून पार्कमध्ये येणाऱ्या प्रवाशाला प्रथम छापील पत्रके देण्यात येतात. त्यात या अस्वलांपासून दूर अंतरावर राहावे अशी सूचना छापलेली असते. शिवाय ठिकठिकाणी अशा धोक्याच्या सूचना फलकांवर लावलेल्या दिसतात. कँपमधील लोकांनी आपले अन्न जपून बंद डब्यात ठेवावे, टेबलावर अन्न राहू देऊ नये, उरलेले अन्न, खाद्यपदार्थांचे डबे जाळून टाकावेत, पुरू नयेत, असा इशारा त्यात दिलेला असतो. पार्कमधील कोणत्याही जनावरांना खायला देण्याचा प्रयत्न करू नये अशीही सूचना दिलेली असते ही जंगली जनावरे दिसली म्हणजे मोटरच्या काचा वर कराव्या, मोटर बाहेर

ठेवली असताना अन्नाचे डबे सुरक्षित बंद मोटारीत ठेवावे, अशाही सूचना पत्रकात दिलेल्या असतात.

आम्ही हॉटेलातून यलोस्टोन पार्कमधील प्रेक्षणीय देखावे पाहायला निघालो, तेव्हा पाऊस झिमझिमत होता. रस्त्यावरून आमच्यासारखे बरेच लोक ओव्हरकोट घालून अगर छत्र्या घेऊन हिंडत होते. या पार्कमध्ये निसर्गाने आपल्या जवळील सौंदर्याची जणू काही उधळण केलेली असावी असे वाटते दूर बर्फाच्छादित डोंगर दिसतात. कित्येकदा बर्फात बुडालेली झाडे व रस्त्यापलीकडच्या बर्फाच्या राशी पाहून असे वाटते की हे बर्फ वर्षभर असेच राहात असावे. अत्यंत शांत व रमणीय दिसणारी गवती कुरणेही पसरलेली दिसतात. यलोस्टोन नदी (जिच्यावरून पार्कला नाव पडले आहे) अरुंद अशा डोंगरांच्या रांगातून ज्या ठिकाणी वाहताना दिसते त्याला लोअर ग्रँड केनिअन म्हणतात. तीच नदी पुढे रुंद होऊन ३०९ फूट उंचीवरून धबधब्याच्या स्वरूपात खाली उडी घेते, त्या ठिकाणाला अपर फॉल्स ग्रँड केनिअन म्हणतात. अगदी धबधब्याच्या खाली जाण्यास मुख्य रस्त्यापासून वाट असून तेथे उभे राहून धबधब्याचे व त्याच्या बाजूच्या वनश्रीचे सौंदर्य बघावयास मिळते. ३०९ फुटांवरून खाली कोसळणारा यलोस्टोन धबधबा येथून अगदी जवळून पाहाता येतो. या धबधब्याशिवाय डोंगरातून वाहणाऱ्या यलोस्टोन व लीव्हिस या नद्यांच्या प्रवाहाचे अनेक लहानमोठे धबधबे या पार्कमध्ये अंतर्भागात आहेत. कित्येक लोक या केनिअन भागात घोड्यावर स्वार होऊन अंतर्भागातील हे धबधबे, तळी, डोंगरातून व घळीतून वाहणारे प्रवाह हे पाहण्यासाठी जातात. कुटुंब मोठे

असले तर सर्वांना मिळून या भागातून फेरफटका करण्यासाठी घोड्याच्या गाड्याही मिळतात. काही लोक नदीच्या पात्रात व तळ्यात असणारे मासे पकडण्यासाठी शांत बसलेले दिसतात.


डोंगर, त्यातून उड्या घेणारे धबधबे, रस्त्यापलीकडील बर्फमय प्रदेश, हिरवीगार कुरणे, या विविधांगी वनश्रीत भर घालण्यासाठीच म्हणून की काय, फर, पाईन वृक्षांनी सजलेली अशी दाट अरण्येही या पार्कमध्ये आहेत. बरोबर वाटाड्या घेऊन या जंगलातील अडचणीच्या पाऊलवाटांनी अंतर्भागात कुठेही जाता येते. अशा वाटा १००० मैल लांबीच्या असतील. याशिवाय अगदी जुनी हजार वर्षांपूर्वीची जुनाट झाडेही तशीच जतन करून ठेवलेली आढळतील. त्यांना 'पेट्रिफाइड ट्रीज' म्हणतात. अशी झाडे सॅनफ्रॅन्सिस्को जवळील मूरवूड्‌स्‌मध्येही आढळतात. मूरवूड्‌स्‌मध्ये अद्यापिही पूर्वीची अत्यंत उंच तांबड्या पानांची झाडे आहेत. जुनाट जतन केलेली झाडे हे अमेरिकन उद्यानांचे वैशिष्ट्य आहे आम्ही अशा १००० वर्षांपूर्वीच्या एका झाडापाशी थांबलो व त्याचे छायाचित्र घेतले. पार्कमधील वनस्पती व वृत्त यांचा अभ्यास करण्यासाठी येथे संशोधन करणारे व व्यासंगी लोक येतात तेथे त्यांना या विषयावरील ग्रंथ, चित्रे, स्लाइड्स, एक्झिबिट्स मिळू शकतात.

यलोस्टोनचे हे विविधांगी सौंदर्य पाहात आम्ही यलोस्टोन लेकला पोचलो. हे तळे म्हणजे या पार्कचे एक खास आकर्षण आहे. अमेरिकेत भारतापेक्षा असंख्य मोठमोठी सरोवरे आहेत. पण सबंध अमेरिकेत या सरोवराइतके विस्तीर्ण व इतक्या उंचीवर असणारे सरोवर दुसरीकडे कोठेही नाही. ते २३ मैल लांब


व १९ मैल रुंद आहे. तेथे आम्ही पोचलो तेव्हा दुपार झाली होती. पाऊस थांबून ऊन पडले होते. सूर्याचे किरण या सरोवराच्या लाटांशी लपंडावाचा खेळ खेळत होते. दृष्टी पोचेल तेथपर्यंत हा जलाशय पसरलेला होता. त्याच्या शांत गंभीर स्वरूपाकडे पाहून मन अंतर्मुख झाले. आपल्या मानससरोवराजवळ आधुनिक मानवी सुधारणांचे चिन्हही दिसणार नाही. पण येथे जवळजवळ २०० तऱ्हतऱ्हेच्या बोटी हौशी प्रवाशांना या जलाशयातून फिरविण्यास सज्ज होत्या. त्यातील काही अगदी छोट्या, तर काही क्रूझरसारख्या, अनेकांना फिरविण्यास सोयीस्कर अशा होत्या. कित्येक लोक या तलावातील मोठमोठे मासे, विशेषत: चविष्ट असे ट्राऊट मासे पकडत असताना दिसले. एका मुलाच्या एका हातात फिशिंग रॉड व दुसऱ्या हातात एक मोठा मासा दिसत होता. पण मला तरी पर्वताच्या कुशीत असणारे आपले मानससरोवर नवीन यांत्रिक सुधारणेपासून दूर आहे तसेच बरे वाटले. त्या उंच प्रदेशात असणारे ते शांत सरोवर मानवाला भौतिक जगापासून दूरदूर ईश्वरसान्निध असण्याचा अनुभव देते. यलोस्टोन पार्कच्या अंतर्भागात गेले तर अशा तऱ्हेचा आध्यात्मिक अनुभव मिळेल असे वाटते. अंतर्भागात जाण्यास बोटी मिळतात. या बोटीत बसून लाटांशी गुजगोष्टी कराव्या असा मोह झाला. पण तेवढ्यात हवा बदलली. डोंगरावरचे सरोवर ते. तेथे क्षणात ढग जमा होऊन अंधार पडतो किंवा वादळी हवा सुरू होते. डॉ. वॉकर म्हणाले, 'इथली हवा कधी बदलेले याचा नेम नाही. एकदा आम्ही या सरोवरात बोटिंगला गेलो होतो. पण दूर अंतरावर गेल्यावर एकदम ढग जमा झाले आणि मेघांचा गडगडाट सुरू झाला. आम्ही



अप्पर फॉलस् ग्रॅन्ड कॅनस येलोस्टोन नॅशनल पार्क



बॅडलॅन्डस् नॅशनल मॉन्युमेंटस्



साऊथ डाकोटा फिझंट




चित्रपटाचे शुटिंग पहाण्यासाठी जमलेला स्त्रियांचा घोळका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भ्रू-प्रकार ८२३
दा. क्र. २०५५८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



माउंट रशमोर मेमोरिअल




धान्याचा राजवाडा (कॉर्न पॅलेस)




ॲमिश मुलगे



बॅडलॅन्डस् नॅशनल मॉन्युमेंटस्



साऊथ डाकोटा अनसरपासड् सिनरी



कॅस्टल गिझर यलो स्टोन नॅशनल पार्क



रशमोर मेमोरिअल मधील
एक चेहरा
लांबी ६० फूट
नाक २० फूट, तोंड १८ फूट
व डोळे ११ फूट आहेत.



टिपिकल कॅरल हर्डस्

कसेबसे जीव घेऊन परत पोचलो. परत आलो तेव्हा जोराचा पाऊस सुरू झाला होता.'

आम्ही सरोवराचे अखेरचे दर्शन घेतले. कारण जेवणाची वेळ झाली होती. आम्ही जवळच्याच लेक हॉटेलमध्ये जेवायला गेलो. तेथे डॉक्टर वॉकरना त्यांच्या दोन विद्यार्थिनी भेटल्या. त्या म्हणाल्या, 'आता कॉलेजला सुट्टी झाली आहे. आम्ही जाहिरात वाचली की या हॉटेलात मदतीला माणसं पाहिजे आहेत. सीझनमध्ये इथे मजा असते. सर्वत्र आनंदी वातावरण असतं. राहायला फुकट सुसज्ज खोली आणि वर पगार मिळतो. फावल्या वेळात आम्हाला पार्कमध्ये हिंडायला मिळतं.' मूळच्या विद्यार्थिनी पण तात्पुरत्या उपाहारगृहसेविका बनलेल्या त्या मुलींनी आपल्या प्रोफेसरांची देखभाल उत्तम केली हे सांगायला नकोच. त्या सुशिक्षित असल्याने त्यांची भाषा सफाईदार होती. बोलणे व वागणे आर्जवी होते. आपल्याला असलेली सर्व माहिती प्रवाशाला द्यायला त्या तत्पर दिसल्या.

हे पार्क पाहिल्यावर अमेरिकन लोकांनी आपली उद्याने कशी सर्व दृष्टींनी परिपूर्ण केली आहेत हे लक्षात येते. प्रवाशांच्या सुखसोयीसाठी करण्यासारखी जी जी गोष्ट असेल ती ती या ठिकाणी त्यांनी केली आहे. या पार्कमध्ये ठिकठिकाणी व्हिजिटर्स सेंटर्स आहेत. तेथे प्रवेश केला की जंगल खात्यातला अधिकारी पुढे येतो. त्याला पार्कमधील जंगले, जनावरे, पायवाटा, वाहने यांची सर्व माहिती असते. तेथे पार्कविषयीची निरनिराळी पुस्तके, चित्रे, पुस्तिका, प्रदर्शने पाहायला मिळतात रेंजर तुमचे सर्व प्रश्न सोडवायला तत्पर असतो. निरनिराळ्या या सेंटर्समध्ये

निरनिराळ्या विषयांच्या स्लाइड्स दाखविण्याचे १०-१२ मिनिटांचे कार्यक्रम असतात. काही कार्यक्रम वन्य प्राण्यांबद्दल तर काही ऊन पाण्याच्या झऱ्यांवर आधारलेले असतात. यलोस्टोन पार्कचा इतिहास, भूगोल व भूगर्भशास्त्र यासंबंधी माहिती देणारे स्लाइड्सचे कार्यक्रम काही लोक पसंत करतात. इतकेच काय, पण प्रवासी जेव्हा मधील रस्त्यावरून मोटर चालवीत असतात, तेव्हा रेडिओ केंद्र येथे आहे अशी निशाणी दाखवणारी ठिकाणेही दिसतात. त्या ठिकाणी थांबून मोटारमधील रेडिओ १६०६ अंशावर लावला की पार्कविषयीची माहिती देणारे रेडिओवरील कार्यक्रम ऐकायला मिळतात.

खरेच, अमेरिकन लोकांनी आपल्या प्रेक्षणीय स्थळांपासून प्रवाशांना शक्य तितका आनंद व माहिती मिळावी म्हणून केवढे प्रयत्न केलेले आहेत! ते राष्ट्र श्रीमंत असल्यामुळे त्यांना पैसा पाण्यासारखा खर्चून हे साध्य करता आले आहे हे जरी खरे असले, तरी ही निरनिराळी साधने वापरताना त्यांनी कल्पकता, प्रतिभा, ज्ञानोपासना व परिश्रम यांचा जो समन्वय साधला आहे तो पाहून मन थक्क होते. आपल्या देशात अमेरिकेपेक्षा प्राचीन अशी अनेक स्थळे व स्मारके आहेत, रमणीय ठिकाणे आहेत, जुनी भव्य देवालये आहेत. त्यांचे सौंदर्य प्रवाशांना बारकाईने व संपूर्णपणे बघायला मिळावे म्हणून आपल्यालाही पुष्कळच करता येईल. तामीळनाडूमधील प्राचीन देवालयांविषयीची माहिती देणारी पुस्तके महागडी असतात. कित्येकदा ती मिळतही नाहीत. अशा ठिकाणी शासनाने ही माहिती सायक्लोस्टाइल करून अल्प किंमतीत प्रवाशांना

उपलब्ध करून दिली तर त्यांच्या खर्चाचा व श्रमाचा काहीतरी मोबदला मिळेल.

पार्क सोडताना वाईट वाटले. कोणतेही सुंदर स्थळ सोडताना दु:ख होते. ते पुन्हा कधी बघायला मिळेल का असा विचारही मनात येतो. या पार्कसारखे अद्वितीयच म्हणता येईल असे स्थळ सोडताना तर मन अधिकच विषण्ण झाले.

पार्कमध्ये आम्ही पश्चिमेकडील द्वाराने प्रवेश केला होता. आता परत निघताना आम्ही पूर्वेकडील दारातून बाहेर पडलो. कारण पूर्वेकडील वाटेवर असणारी दुसरी प्रेक्षणीय स्थळे आम्हाला बघायची होती. पार्क सोडल्यावर रस्ता उंच वृक्षांच्या जंगलातून खाली जाऊ लागला. वनश्री शोभिवंत होती. उंच पर्वतावरील वनश्री सोडून खाली सपाट मैदानावर जाण्यास मन घेईना. पर्वतावरून ५२ मैल खाली उतरल्यावर कोडी हे गाव लागले. या नावाचे गाव विल्यम फ्रेडरिक कोडी याच्या नावावरून पडले आहे. कोडी हा आयोवा प्रांतात जन्मला (१८४६-१९१७) तो गव्यांची शिकार करण्यात पटाईत होता. दीड वर्षात त्यान ५००० गवे मारले असतील आणि म्हणूनच त्याला 'बफॅलो बिल्' असे नाव पडले. रेल्वे प्रथम चालू झाली तेव्हा ही जनावरे इतकी विपुल होती की आगगाडीच्या खिडकीतून नेम धरून त्यांना बंदुकीने ठार करता येत असे. १९६० साली गवा जात संपुष्टात आली.

कोडी हे शहर बफॅलो बिल यानेच बसवले. कोडी शहरात अलीकडेच 'बफॅलो बिल् हिस्टॉरिकल सेंटर' स्थापन झाले आहे, या ठिकाणी बफॅलो बिलची आठवण जतन करणाऱ्या त्याच्या

संबंधीच्या खास वस्तू आहेत.

गोरे लोक अमेरिकेत येण्यापूर्वी गवे हजारांच्या संख्येने होते. रेड इंडिअन लोक त्याचे मांस खाऊन उपजीविका करीत. ते लोक शिकार करण्यात फार निष्णात होते. या रेड इंडिअन लोकांचा पाडाव करायचा तर हे बफॅलो नाहीसे केले पाहिजेत असे गोऱ्या वसाहतवाल्यांनी ठरवले व मग त्यांचा हजारांनी विध्वंस केला. १८७० सालानंतर ही जनावरे अगदी अल्पसंख्य झाली. इंडिअन लोकांची शरणागती मिळाली ही जनावरे नाहीशी झाल्याने शेती करणे व दुभती जनावरे ठेवणे शेतकऱ्यांना सुलभ होऊ लागले. गोऱ्या लोकांनी या भागात संचार सुरू केला, त्यावेळी तेथील रेड इंडिअन लोकांनी त्यांच्याशी जबर लढाई दिली. या लढायात कोडी हा 'स्काउट' म्हणजे गोऱ्या लोकांच्या वतीने हेरगिरी करीत असे. त्यानंतर अमेरिकेतील यादवी युद्धात त्याने फेडरेल सैन्याच्या बाजूने हेरगिरी केली. झुंझार, रानटी पश्चिमेतील (वाइल्ड वेस्ट) दंतकथात बफॅलो बिल याच्या नावाने बऱ्याच गोष्टी रचलेल्या आहेत. युद्ध संपल्यानंतर त्याला कोणी विचारेना तेव्हा त्याने स्वतः एक पश्चिम अमेरिकेतील जंगली सर्कस (वाइल्ड वेस्ट शो) तयार केली व ती घेऊन तो गावोगावी हिंडत असे व आपली उपजीविका करीत असे. अजिंक्य पश्चिमेची सिनेसृष्टी अनेक साहसकथांनी भरलेली आहे. चित्तथरारक अशा पश्चिम अमेरिकेच्या चित्रपटांत दाखविलेले मारामारीचे जीवन आता अमेरिकेत कुठे पाहायला मिळत नाही पण वायोमिंगमध्ये अजून त्याच्या खुणा राहिलेल्या आहेत.

आम्ही कोडी सोडले, आणि गंमत अशी की पुन्हा घाट

लागला. आम्हाला वाटले की असेल छोटासा घाट पण पाहतो तर डोंगरांच्या रांगा उंचउंच होत चालल्या. एकामागून एक रांगा ओलांडताना संध्याकाळ होत आली. यलोस्टोन पार्क सोडताना आपण पर्वतांचा अखेरचा निरोप घेत आहोत असे वाटले होते. मी डॉ. वॉकरना आश्चर्याने विचारले, 'मला वाटलं की यलोस्टोनपार्कला सगळे डोंगर संपले मग हे कुठले?'

डॉ. वॉकर उत्तरले, 'ह्या डोंगरांचं नाव हॉर्नपर्वत. या पर्वतात म्हणे अनेक वर्षांपूर्वी स्वीड लोक सोनं हुडकायला आले पण इथल्या रेड इंडिअन लोकांनी त्यांचा पाठलाग करून त्यांचा धुव्वा उडवला असं म्हणतात की त्यांच्यापैकी एकच माणूस जिवंत राहिला होता. तो सोन्याने भरलेले दगड, खडक उचलता येतील तितके गोळा करून पळत असता वाटेत त्याला झालेल्या जखमांनी मरण पावला. त्या माणसाला सोनं कुठं मिळालं होतं ते सांगता आलं नाही. तेव्हापासून आजपर्यंत या खाणी अज्ञातच राहिल्या आहेत!'

आम्ही उंच उंच पर्वत ओलांडीत होतो. पण या डोंगरांवर यलोस्टोन पार्कमधील डोंगरांसारखी झाडी नव्हती. इतक्या उंच पर्वतांवरही रस्ता रुंद व गुळगुळीत होता. या सबंध घाटात आम्हाला एकच मोटर दिसली व तीही एकटी स्त्री चालवीत होती. ते पाहून मला माझ्या भित्रेपणाची लाज वाटली. आम्ही तिघेतरी होतो, पण ती स्त्री एकटीच होती, रस्ता अगदी निर्मनुष्य होता. गाडीला काही बिघाड झाला तर त्या घोर एकांतात थंडीत कुडकुडत राहावे लागले असते. सुदैवाने आमची मोटर सबंध प्रवासात एकदाही बंद पडली नाही. अंधार पडत होता. डोंगर

संपण्याचे चिन्ह दिसेना. उलट आम्ही एका उत्तुंग अशा पठाराकडे जात होतो. आजूबाजूला इतस्तत: बर्फाचे डोंगर, बर्फाची धूळ व हिमाच्छादित शिखरे दिसत होती, मला वाटले, कुठे हिमालयात तर आलो नाही ना! संध्याकाळची कातरवेळ येथून मनुष्यवस्ती खूप लांब असली पाहिजे. पण डॉ. वॉकरनी मला दिलासा दिला ते म्हणाले. 'आपण आता १०,००० फूट उंचीवर आलेले आहोत. ही शेवटची रांग ओलांडीत आहोत. आता येथून आपण लवकरच खाली उतरायला लागू.' लवकरच डोंगर उतरून आम्ही टेकड्यांमधून वाट कापू लागलो. हॉर्न पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या एका पेल्यासारख्या आकाराच्या खोलगटात आम्ही जाऊ लागलो. काही वेळाने आम्ही बर्फेलो या गावात प्रवेश केला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लहानलहान शोभिवंत घरे होती. इतर अमेरिकन छोट्या गावांप्रमाणे येथेही एक चर्च, वाचनालय, जीवनावश्यक वस्तू मिळण्याचे भांडार (डिपार्टमेंटल स्टोअर) दिसले. यलोस्टोन पार्कमधून आम्ही २३५ मैल आलो होतो. एवढा लांब प्रवास व तोही डोंगर ओलांडून करायला आम्हाला ६ तास लागले होते.

डॉ. वॉकरनी एका छोटेखानी बंगलेवजा घरासमोर मोटर थांबवली. सुंदर, रंगीबेरंगी पडद्यांनी सजलेले, लहानशी बाग असणारे व रम्य पर्णकुटीसारखे दिसणारे ते स्थान म्हणजे एक मॉटेल होते. त्याचे नाव 'मॅन्शन हाऊस मॉटेल.' एका तासापूर्वी आम्ही कुठल्याकुठे १०,००० फूट उंचीवर बर्फमय पर्वतशिखरावर होतो! आणि आता एखाद्या परीकथेत शोभेल अशा सर्व अद्ययावत सुखसोयींनी समृद्ध अशा घरकुलात पोचलो

होतो.

सकाळी उठून स्नान वगैरे उरकून आम्ही जवळच्याच रेस्तराँमध्ये ब्रेकफास्ट घेतला आणि पुन्हा प्रवासाला सुरुवात केली. हॉर्न पर्वत पश्चिमेकडेक दिसत होते. आम्ही आता पूर्वेकडे जाऊ लागलो. बफॅलो गावाच्या असामंतात 'सेज पुश' नावाची पुदिन्यासारखी सुवासिक झुडपे पसरलेली आहेत त्यांचा सुगंध हॉर्न पर्वतावरून येणाऱ्या वाऱ्याने सर्वत्र दरवळत होता. ह्या झाडांना पिवळी, पांढरी फुले येतात. बफॅलो गावातून दोन मोठमोठे आंतरप्रांतीय (इंटरस्टेट) राजरस्ते जातात आणि त्यामुळे हे शहर ईशान्येकडे जाणाऱ्या वाटेवरचे मोठे जंक्शन बनले आहे. पावडर नदी ओलांडून आम्ही जाऊ लागलो, तो चांगलेच दाट अरण्य लागले. झिमझिम पाऊस पडत होता. हळूहळू डोंगराळ भाग सुरू झाला. हे डोंगर हॉर्नपर्वताइतके उंच नव्हते. यांचं नाव ब्लॉक हिल्स. आता आम्ही वायोमिंग प्रांत सोडून साऊथ डॅकोटा संस्थानात प्रवेश केला होता. डॅकोटा या नावाच्या इंडिअन लोकांच्या जमाती होत्या. त्यावरून या प्रदेशाला त्यांचे नाव मिळाले आहे. इंडिअन भाषेत त्या शब्दाचा अर्थ 'साथी' असा आहे.

साऊथ डॅकोटा हा रेड इंडियन लोकांचा प्रदेश आहे. येथे त्यामुळे या प्रदेशातील प्रत्येक वस्तुसंग्रहालयात इंडियन लोकांनी केलेल्या कलावस्तू ठेवलेल्या आहेत. या लोकांनी गोऱ्या लोकांशी मोठमोठ्या लढाया केल्या व पराक्रम गाजवले. त्यामुळे या प्रदेशात ठिकठिकाणी इतिहासाच्या खुणा आहेत. शेवटी फसवून अखेरच्या लढवय्यांना गोऱ्या लोकांनी शरणागती

पत्करायला लावली व त्यांना त्यांच्या खास राखीव प्रदेशात (रिझर्व्हेशन्स) कोंबले. एका वेळचे हे स्वाभिमानी वीर अगदी गरीब बनले. त्यांना शिकारीची आवड. पण आता त्यांना ओसाड जागेत शेती करण्याशिवाय मार्ग उरला नाही. सुधारलेल्या अमेरिकेत हे लोक अजून जळणाची लाकडे विकून पैसे मिळवतात. त्यांना वाहतुकीची साधने नसल्याने ते जाणाऱ्यायेणाऱ्या ट्रक्समध्ये लिफ्ट मागतात. साऱ्या डॅकोटामध्ये रिझर्व्हेशन्स बरीच आहेत. त्यातील 'रोझबड' या रिझर्व्हेशनमध्ये एकाकाळचे लढवय्ये सू जातीचे इंडिअन लोक राहतात. सर्व जगातील गरीब व मागसलेल्या लोकांना मदत करणारी अमेरिका येथील मूळच्या रेड इंडिअन लोकांशी इतक्या परकेपणाने का वागते याचे मला कोडे पडले. या रिझर्व्हेशन्समधील इंडिअन लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यांच्या मुलांना पुरेशा शाळाही नाहीत.

साउथ डॅकोटा हा प्रांत सोन्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध आहे. शेतीनेही या प्रांताला भरभराटीला आणले आहे. पण या प्रांताचा मुख्य व्यवसाय म्हणजे पर्यटन (टूरिझम). या प्रांतात असणारी निरनिराळी प्रेक्षणीय स्थळे दरवर्षी २५ कोटी डॉलर्स मिळवून देतात.

रेड इंडिअन लोकांना या डोंगरांच्या काळ्या रंगाचा विशेष दरारा वाटत असे. या डोंगरांना ते पवित्र समजत असत. त्यांच्या भाषेत ब्लॅक हिल्सचे नाव 'पाहा सापा' असे होते. मी डॉ. वॉकरना विचारले, 'या डोंगरांना ब्लॅक हिल्स का म्हणतात?'

ते उत्तरले, 'या अरण्यात उगवणारे पाईन वृक्ष पाँडेराझा

किंवा 'पश्चिमी पिवळे' या नावाने प्रसिद्ध आहेत. या झाडाची साल काळ्या रंगाची असल्यामुळे या झाडांना 'ब्लॅक जॅक पाईन' असेही गमतीने म्हणतात. असे हे पाईन वृक्षांचे जंगल दुरून पाहिले तर काळ्या रंगाचे दिसते आणि म्हणूनच या डोंगरांना 'ब्लॅक हिल्स' हे नाव मिळाले आहे.'

'म्हणजे आमच्या महाबळेश्वरला जशी ब्लू व्हॅली आहे तसाच हा प्रकार म्हणायचा!' मी उद्गारले.

आम्ही जसे डोंगरांकडे जाऊ लागलो, तशी वनश्रीही बदलली. पुन्हा पाइन वृक्षांच्या झाडीतून आम्ही डोंगर ओलांडू लागलो. डॉ. वॉकर म्हणाले, 'या ब्लॅक हिल्समध्ये पूर्वी अमेरिकेतील सर्वात मोठी अशी सोन्याची खाण सापडली होती. त्यावेळी झालेल्या 'गोल्ड रश' मध्ये अनेक धाडसी लोकांचा लोंढा या पर्वतांवरून वाहात होता.' भयंकर साहसांनी भरलेल्या त्यावेळच्या बिल हिकॉक कलॅमिटी जेन आणि इतरांच्या कथा त्या काळातील लोकांना चांगल्या परिचित होत्या. या दाट अरण्यातून जात असता त्या साहसांची आठवण भीतिदायक वाटली. कारण त्या एकाकी गर्द झाडीच्या रस्त्यावरून आमची एकच मोटर चालली होती. आम्ही 'ज्युवेल केव्हज'कडे जात होते. पण तेथे जाण्यास इतरही अनेक रस्ते आहेत त्यामुळे अशा दूरदूरच्या रस्त्यांवर रहदारी असत नाही.

हे 'कृष्णगिरी' १२० मैल लांब व ६० मैल रुंद आहेत या डोंगरांचे सर्वात उंच शिखर 'हॉर्न पीक' हे ७२४२ फूट उंच आहे. सपाट प्रदेशात उभे असलेले हे डोंगर येणारास आश्चर्यचकित करून टाकतात. कारण ते एकदम या सपाट प्रदेशात असतील

अशी नवख्या माणसास कल्पना नसते. पाईन वृक्षांबरोबर येथे महागनी वृक्षही दृष्टीस पडतात. त्यांचा रंग काळसर गर्द तपकिरी असल्याने पाईन वृक्षांशी उत्तम रंगसंगती साधतो. मे महिना असल्याने निरनिराळ्या रंगाची रानफुलेही वाऱ्याने हलताना दिसत होती. मध्येच दोन हरणे विद्युल्लतेप्रमाणे चमकून मोटरसमोरून गेली.

या अरण्यात निरनिराळ्या जातींची हरणे, डोंगरी बकरे, तऱ्हेतऱ्हेच्या खारी, उंदीर, यांच्याबरोबर क्रूर अशी बीझल्स व बफॅलो ही जनावरेही वास्तव्य करतात असे समजले. त्यात मुख्यत: सोनेरी घुबड, जंगली कोंबड्या, सुतारपक्षी, बहिरी ससाणे (हॉक्स) असे विविध जातींचे पक्षीही साध्या चिमण्यांच्या बरोबरीने हिंडताना आढळतात.

थोड्याच वेळात आम्ही ज्युवेल केव्हज्पाशी पोचलो. या गुंफा एका उंच डोंगराच्या पठारावर बसलेल्या आहेत. आजूबाजूचा प्रदेश पाईनवृक्षांच्या अरण्याने वेढलेला आहे. १२०० एकर जागेवर पसरलेल्या या गुफांच्या आसपास वसंतऋतूत व उन्हाळ्यात निरनिराळी रानटी फुले वाऱ्याने डुलत असलेली आढळतात. इतर प्रेक्षणीय अमेरिकन स्थळांप्रमाणे येथेही पाहुण्यांना सर्व माहिती देणारा असा एक काउंटर दिसला. त्याला लागूनच चित्रे व स्मरणवस्तू (सुव्हेनीर्स) विकणारी एक जागा होती. विश्रांती घेण्यासाठी जवळच सुसज्ज अशा आरामशीर खोल्या असून जवळच एक सहलस्थळ (पिकनिक एरिया) होते. त्या ठिकाणी खुर्च्या-टेबल वगैरे असल्यामुळे तेथे आपण बरोबर आणलेले खाद्यपदार्थ खाता येतात. जवळच

हस्तमुखप्रक्षालनासाठी वॉश बेसिन्स व पिट टॉयलेटस् यांची सोय होती. मात्र या आवारात उपाहारगृह नाही.

या रत्नगुंफा भूगर्भात आहेत. वरून दिसत नाहीत. त्यांचा शोध सहज लागला. आल्बर्ट आणि फँच मिचर्ड या दोघा बंधूंना उन्हाळ्यात ब्लॅक हिल्समधून हिंडत असताना एकदम भूगर्भातून वाऱ्याची झुळूक आल्यासारखी वाटली. त्यांना वाटले की या ठिकाणी जमिनीच्या अंतर्भागात एखादी सोन्याची खाण असावी. ही गोष्ट १८ ऑगस्ट १९०० साली घडली. त्यांनी चार्ल्स बुश यांच्या मदतीने ते जमिनीतील भोक उकरले. आता त्यांना सोन्याची खाण मिळाली नाही पण निसर्गाने निर्माण केलेली रत्नांप्रमाणे चमकणारी कॅलसाईट क्रिस्टल्सची (Calcite crystals) बनलेली अशी शोभिवंत गुंफा सापडली त्यांनी हौशी प्रवाशांसाठी ह्या ठिकाणी एक नवीन स्थान निर्माण केले १९३३ साली प्रेसिडेंट रूझवेल्ट असताना त्यांनी या गुंफा सरकारच्या ताब्यात दिल्या. त्या आता नॅशनल पार्क सिस्टिमच्या एक भाग बनल्या आहेत. अजून त्यांचा शोध चालू आहे व दरवर्षी नवीन गुहा सापडत आहेत. ४० मैल लांबीच्या प्रदेशात या गुहा पसरल्या आहेत असा अंदाज आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
ना. क्र. ८२३
२९५५८
७३।७।९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ४

. या गुहा कशा बनल्या याचे आपणास आश्चर्य वाटते. आपल्या देशात अशा तऱ्हेच्या गुहा कोठेही आढळत नाहीत. अमरनाथच्या गुहेत खडकांतील भोकातून झिरपणाऱ्या पाण्याने बर्फाचे शिवलिंग बनले असे आपण वाचतो. पण अशा प्रकारच्या कारागिरीचा नमुना कोठे दिसत नाही. ३० कोटी वर्षांपूर्वी (३०० मिलियन वर्षांपूर्वी) या ठिकाणी समुद्र असावा.

त्यात असणारा चुनखडीचा दगड भूकंपामुळे समुद्राच्या जागी आलेल्या काळ्या डोंगराळ प्रदेशात पसरला. या चुनखडीच्या दगडात ज्या भेगा किंवा चिरा असत त्यातून पावसाचे पाणी आत झिरपे. हे पाणी आम्लयुक्त असल्यामुळे त्याने चुनखडी विरघळून भूगर्भात चित्रविचित्र आकृती निर्माण झाल्या. या झिरपणाऱ्या पाण्यामुळे चुनखडी विरघळल्यावर त्याचे कॅलशियम् कार्बोनेट् हे रसायन उत्पन्न झाले. या रसायनामुळे गुंफांच्या भिंतींवर, तक्तपोशींवर, चित्रविचित्र नक्षीदार स्फटिकवत् रत्नांसारख्या चमकणाऱ्या निरनिराळ्या रंगांच्या विविध व शोभिवंत आकृती तयार झाल्या. या गुहा चांगल्या प्रशस्त आहेत. कित्येक चिंचोळ्याही आहेत. काही गुंफातील हे नैसर्गिक कोरीवकाम रंगीबेरंगी आहे. तपकिरी, लाल, पिवळा, हिरवा, लव्हेंडर, असे अनेक रंग या कारागिरीला नैसर्गिक रीत्याच लाभले आहेत. ज्युवेल केव्हज् मधील 'रत्ने' सर्व भिंतींवर व तक्तपोशींवर निरनिराळ्या आकृतीत पाहायला मिळतात. या गुहात वटवाघळे, जाड शेपटीच्या घुशी, पांढऱ्या पायांचे उंदीर, रातकिडे वगैरे प्राणी वास्तव्य करतात. काहीकाही गुंफात तऱ्हतऱ्हेचे शेवाळही उगवते.

या गुहा अनेक आहेत. त्यांपैकी दोनच पर्यटकांना पाहायला मिळतात. दोहोंपैकी पुराणी (Ancient) गुहा फार खोल व खडकाळ आहे. आत दिवे नसल्याने बरोबर गॅसचे कंदील न्यावे लागतात. अंधाऱ्या, चिंचोळ्या, बिळासारख्या असणाऱ्या बोळातून जावे लागते. खूप चढावे, उतरावे लागते. अंधारामुळे रंग दिसत नाहीत. कित्येक ठिकाणी वाट इतकी अरुंद आहे की रांगत

जावे लागते दुसरी गुहा जास्त सोपी व प्रशस्त आहे. या गुहेतही ॲल्युमिनिअमचे जिने चढावे उतरावे लागतातच परंतु इलेक्ट्रिक दिवे असल्याने या नैसर्गिक शिल्पाचे रंग मनोहर दिसतात. कित्येकदा गुदमरल्यासारखे होते. ज्यांना हृदयविकार असेल किंवा श्वासोच्छवासाचे दुखणे असेल, नुकतीच शस्त्रक्रिया झालेली असेल, अशांनी या रत्नगुंफात जाऊ नये असा आदेश देण्यात येतो. उंच टाचेचे बूट घालू नयेत, अनवाणी चालू नये, अशी ताकीद देण्यात येते. रबराचा तळ असलेले आरामशीर बूट घालणे श्रेयस्कर आहे असे सांगण्यात येते. धूम्रपानाची आत मनाई आहे. कुत्री, मांजरे नेऊ नयेत असा नियम आहे. हँडबॅग किंवा कॅमेरे मोटारगाडीत बंद ठेवावे अशी सूचना देण्यात येते. मात्र काठी घेऊन जाता येते. पाच वर्षांखालील मुलांना प्रवेश मिळत नाही.

आम्ही नंबर दोनची कमी परिश्रमाची गुंफा (मॉडर्न केव्ह) पाहण्यासाठी जावयाचे ठरविले. एका यांत्रिक पाळण्यात (एलेव्हेटर) बसलो व लवकरच २५० फूट खोल असणाऱ्या या गुहेत प्रवेश केला. रत्नगुंफा स्फटिकवत अलंकारांनी नटलेली होती. प्रथम आम्हाला भिंतीवर फणसासारखे काटे असणारे टोकदार खडे दिसले. काही जनावरांच्या दातांसारखे भयाण भासत होते. तेथून आम्ही जिने उतरून खाली गेलो. इलेक्ट्रिक लाईट असल्यामुळे त्या रंगीबेरंगी स्फटिकांची विविध रूपे अत्यंत आकर्षक दिसत होती. हे सगळे स्फटिक कॅल्साइटस होते. त्यांचे निसर्गनिर्मित सौंदर्य मानवाच्या कलेला जणू आव्हान देत होते. काही नाजुक स्फटिकांची जणू काही लेसच बनली होती. काही लोलकांसारखे डुलत होते, तर काही झुंबरांसारखे लोंबत होते. हे

हिऱ्यामाणकांसारखे चमकरणारे, निरनिराळ्या नक्षीचे कोरीवकाम असणारे खडक मोठे प्रेक्षणीय दिसतात. आतमध्ये अनेक पोकळी होत्या. काही ठिकाणी जाताना वाकावे लागते. जिकडे बघावे तिकडे चमचमणाऱ्या रत्नांची जणू उधळणच केलेली होती. ह्या रत्नांचे सौंदर्य पाहून मन थक्क झाले. ती निसर्गाची किमया बघून आम्ही हरखून गेलो.

गर्द झाडीत असलेल्या रत्नगुंफांकडे शेवटचा दृष्टिक्षेप टाकून आम्ही कस्टर या लहानशा शहराकडे जाऊ लागलो. १९ व्या शतकाच्या मध्यावर साउथ डॅकोटामध्ये रेड इंडिअन लोकांचे साम्राज्य होते. गोरे लोक आपल्या खाणीतील सोने लुटण्यासाठी आले आहेत असे समजल्यावर इंडिअन लोकांनी त्यांना जोराचा प्रतिकार केला. सू व शेणे जातीच्या इंडिअन लोकांनी कित्येक ठिकाणी गोऱ्या लोकांची दबा धरून कत्तल केली. काही ठिकाणी लढाया केल्या. त्यात त्या गोऱ्या सैनिकांनी व लष्करी अधिकाऱ्यांनी शौर्य दाखवले, त्यांची स्मारके आज आपल्याला ठिकठिकाणी पाहावयास मिळतात. पण त्याबरोबर आज विजयी झालेल्या गोऱ्या लोकांनी इंडिअन लोकांचा कसा लबाडीने व क्रूरपणे संहार केला व त्यांना अखेरीस रिझर्व्हेशन्समध्ये हाकून दिले याचाही वृत्तांत आजचे अमेरिकन इतिहासकार नमूद करीत आहेत. त्या हकीकती वाचल्या, म्हणजे आपणांस इंडिअन लोकांची कीव येते. परंतु अमेरिकन इतिहासकार आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाबरोबरच त्यांचा काळा इतिहासही लपवून ठेवीत नाहीत याचे कौतुक वाटते.

कस्टर हे गावसुद्धा अशाच एका रेड इंडिअन लोकांशी

झालेल्या लढाईसाठी प्रसिद्ध आहे. जनरल जॉर्ज कस्टर (१८३९-१८७६) याच्या सैन्याची लिटर बिग हॉर्नच्या लढाईत सू जातीच्या इंडिअन लोकांनी कत्तल केली. त्यात तो १८७६ साली मृत्यू पावला. या कस्टरचे या शहराला नाव दिलेले आहे.

कस्टरमधील एका रेस्टॉरॉंमध्ये आम्ही जेवायला गेलो. एक वाजल्यामुळे उपाहारगृह भरले होते. मी प्रवेश करताच बरेच लोक आश्चर्याने माझ्याकडे पाहू लागले. कारण साडी पेहेरलेली भारतीय स्त्री त्यांनी कधी पाहिली नसावी. न्यूयॉर्क किंवा इतर मोठ्या शहरांतून भारतीय स्त्रिया पुष्कळ आढळतात. पण कस्टरमध्ये राहाणाऱ्या लोकांनी आपल्या प्रदेशाबाहेर दूरचे प्रवास केलेले नसावेत. त्यामुळे सर्वांचे डोळे माझ्याकडे लागले. मला जरा लाजल्यासारखे झाले. वेटरला डॉ. वॉकर म्हणाले, 'या माझ्याबरोबर आलेल्या बाई दूर भारतातून आलेल्या आहेत. हिंदू असल्याने शाकाहारी आहेत. शाकाहारी पदार्थ काही मिळतील का?'

आता मला शाकाहारी पदार्थ काय द्यावे असा वेटरला विचार पडला.

मी वेटरला म्हटले, 'मला पाव, लोणी, चीज्, बटाटे आणि स्वीट डिश दिलीस म्हणजे पुरे.' त्याने हसून म्हटले, 'सॉरी, आमच्याकडे नाही.' शेवटची गोड डिश ग्रेप फ्रूटची बनवलेली होती. डॉ. वॉकर म्हणाले, 'ग्रेप फ्रूट हे आमचे राष्ट्रीय फळ आहे खाऊन तर पहा!' मागे मी ग्रेप फ्रुट ज्युस घेतला होता. तो मला जरा कडवट वाटला होता. पण हे पुडिंग चांगले लागले.

जेवण झाल्यावर चॉकोलेट खात आम्ही मोटारीत बसलो

व रशमोर पार्कच्या रस्त्याने जाऊ लागलो. आमचा रस्ता डोंगरातून जाऊ लागला. आजूबाजूला उंचउंच पाईन वृक्षांचे अरण्य होते; मध्येच एक अत्यंत सुंदर रंगीबेरंगी पक्षी दिसला. डॉ. वॉकर म्हणाले, 'हाच तो फेझंट पक्षी' साउथ डॅकोटा हे स्टेट या पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. इतर स्टेटस्‌मधील शिकारी शिकार करायला मुद्दाम या भागात येतात. असे म्हणतात की या पक्ष्यांची संख्या ८० लाख इतकी होती. साऊथ डॅकोटा संस्थानाला यामुळेच 'जगाची फेझंट कॅपिटल' असे म्हणतात. हे फेझंट पक्षी खाद्यपदार्थ म्हणून चविष्ट समजले जातात. कस्टरमधील हॉटेलात जेवताना डॉ. वॉकरनी फेझंट पक्ष्याचा खाद्यपदार्थ का मागवला होता याचे मला आता रहस्य समजले.

हळूहळू रस्त्याच्या बाजूचे जंगल कमी होऊ लागले. रस्ता अधिक प्रसन्न वाटू लागला. रशमोर पर्वताकडे जात असता गुलाबी, सोनेरी अशी ग्रॅनाइट दगडांची टेकाडे दृष्टिपथास आली. आजूबाजूला हिरवागार प्रवेश पसरला होता. रस्त्याने हौशी पर्यटकांचे दर्शन होऊ लागले. कारण आम्ही 'माऊंट' या प्रसिद्ध पर्यटनस्थळाकडे चाललो होतो. लवकरच एक सुंदर बाग लागली. अनेक मोटारी रांगेने उभ्या केलेल्या दिसत होत्या. आम्हीही आमची गाडी थांबवली व माउंट रशमोर नॅशनल म्युझिअमपाशी पोचलो.

बागेतून आत गेलो. सर्वत्र उल्हसित पर्यटक पसरलेले होते. प्रथम आम्ही माउंट रशमोर येथील उंच खडकात खोदून कोरून बनविलेल्या शिल्पांचे दर्शन घेतले. मी 'खोदले' व 'कोरले' असे शब्द वापरले आहेत; पण खरे म्हणजे ६००० फूट

उंचीच्या डोंगरातील मोठमोठे फत्तर सुरुंगाने उडवून नंतर ते खोदून व कोरून काढलेले आहेत. चार अमेरिकन प्रेसिडेंट्सचे चेहेरे या खडकात कोरलेले आहेत. ते प्रेसिडेंट्स म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, जेफरसन, अब्राहम लिंकन व थिओडोर रूझवेल्ट हे होत. या विलक्षण, साहसी व कुशल कारागिरीचा जनक गटझन बोर्गलम हा होय. त्याने हे काम १९२७ साली सुरू केले पण त्याचे स्वप्न पुरे होण्यापूर्वीच १४ वर्षांनंतर तो १९४१ साली मृत्यू पावला. त्याचा मुलगा लिंकन बोर्गलम याने हे काम त्याच वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात पुरे केले. दर वर्षी सुमारे २० लाख लोक हे स्मारक बघावयास येतात. वर्षभर ते उघडे असते. पण हिवाळ्यात डोंगरात बर्फ पडते व त्यामुळे या स्मारकापर्यंत मोटारी किंवा बसेस यांच्या वाहतुकीला अडचण उत्पन्न होते.

प्रत्येक प्रेसिडेंटचा चेहेरा हनुवटीपासून वरपर्यंत कोरलेला आहे. त्याची लांबी ६० फूट आहे. नाक २० फूट लांब असून तोंड १८ फूट रुंद व डोळे ११ फूट रुंद आहेत. हा चेहेरा जर प्रमाणबद्ध शरीरावर उभा केला तर ४६५ फूट उंचीचा पुतळा तयार करावा लागेल. येथे अर्थातच पुतळे नसून नुसते चेहेरेच कोरलेले आहेत. दोरी लावून या चेहेऱ्याच्या नाकापासून वर कपाळापर्यंत प्रवास करता येतो. हे शिल्प पाहून मन थक्क होते. कारण प्रत्येक प्रेसिडेंटचा चेहेरा अगदी हुबेहुब साधला आहे. शिल्पकाराचा हेतू या कोरीव चेहेऱ्याच्या निव्वळ जंगी आकाराने लोकांनी भारून जावे असा नव्हता. या शिल्पाच्या विषयाची महानता लोकांच्या मनात बिंबवावी असा त्याचा उद्देश होता. जयवर्मन राजाने अकराव्या शतकात स्वत:च्या सम्राटपदाने लोकांनी थक्क व्हावे

म्हणून कंबोडियातील जगप्रसिद्ध अंगकोर थॉंग या स्थळाजवळील बेयॉन मंदिराजवळ स्वत:चे २०८ चेहेरे ५२ अजस्त्र खांबांच्या चारी दिशांना करवून घेतले. या देवळात कोठेही गेले असता सगळीकडे जयवर्मनचे चेहेरे दिसतात. प्रत्येक चेहेरा ३० फूट उंच असून अत्यंत बारकावे साधून कोरलेला आहे. अर्वाचीन काळातील या बलाढ्य अमेरिकन प्रेसिडेंट्सचे चेहेरे त्यांनी स्वत: बनवून घेतलेले नाहीत. एका सामान्य माणसाने लोकशाहीचे प्रतीक अशा या राष्ट्राध्यक्षांचे चेहेरे लोकशाहीच्या महात्मतेचे स्मारक म्हणून अजरामर केले आहेत. त्यांना या कारागिराने लोकशाहीचे तीर्थक्षेत्र (शाइन ऑफ डेमॉक्रसी) म्हणून गौरविले आहे.

या शिल्पांच्या खाली पसरलेला डोंगरांनी वेढलेला सपाट प्रदेश म्हणजे एक अर्धवर्तुळात्मक नैसर्गिक रंगमंचच म्हणावयाचा. रात्रीच्या वेळी या रंगमंचावर कार्यक्रम होतात. त्यावेळी या शिल्पावर प्रकाशाचा झोत टाकण्यात येतो. ग्रॅनाईटच्या शिल्पावरून या प्रकाशाचे परावर्तन झाले म्हणजे हे चेहेरे जणू काही सजीव असल्यासारखे दिसतात.

आकाशातून जाणाऱ्या ट्रॅमने माउंट रशमोर येथील राष्ट्रपतींच्या मुद्रांचे जवळून निरीक्षण करता येते. ही ट्रॅम सोळा अ हायवेवरील कीस्टोन या ठिकाणाहून निघते. या ट्रॅममध्ये बसले असता राष्ट्रपतींच्या भव्य मुद्रांचे अगदी जवळून दर्शन घेता येते. कीस्टोनपासून एक 'व्हर्ली बर्ड' नावाचे हॅलिकॉप्टर निघते. त्यात बसूनही हे दृश्य जवळून बघता येते.

या कोरीव मुद्राचे दर्शन घेतल्यावर आम्ही एका प्रशस्त इमारतीत असणाऱ्या भेटवस्तुसंग्रहालयामध्ये गेलो. तेथे विविध

स्मरणिका, माहितीपुस्तके, चित्रकार्डे व या भागात प्रसिद्ध असलेल्या खास आकर्षक अशा वस्तू ठेवलेल्या होत्या. कित्येकदा या शिल्पांच्या कोरीव मुद्रा स्वच्छ करण्यासाठी दोर लावून नाकातोंडावरून चढावे लागते. त्याची विलक्षण छायाचित्रे चित्रकार्डावर काढलेली दिसली. या भागात जेडच्या खाणी आहेत. या जेड खड्याच्या अंगठ्या आम्हाला विशेष आवडल्या. त्या आम्ही रशमोरची आठवण म्हणून विकत घेतल्या. चित्रकार्डेही घेतली. संध्याकाळी जेव्हा सूर्यास्त होतो तेव्हा आकाशातील गुलाबी पार्श्वभूमीवर या शिल्पांना आगळेच वैभव प्राप्त होते. आम्ही निघालो तेव्हा सूर्यास्त नुकताच झाला होता. त्यामुळे ते भव्यदृश्य आम्हाला पहायला मिळाले. ते सोडून जावेसे वाटेना. पण आम्हाला पुढचा टप्पा रॅपिड् सिटी हा गाठायचा असल्याने मोठ्या नाखुषीने आम्ही परत मोटारीत बसलो. रशमोर सोडीत असताना आकाशात तारा दिसल्या. मी डॉ. वॉकरना विचारले, 'या तारा कसल्या?' ते म्हणाले, 'हीच ती एरिअल ट्रामवे. माउंट रशमोरचे सौंदर्य आकाशातून पाहणाऱ्या हौशी पर्यटकांसाठी या तारावरून अंतराळातील ट्राम जाते. या ट्रामला २-३ डबे असतात. त्यात बसले म्हणजे राष्ट्रपतींचे कोरलेले चेहेरे, बगीचा, फुलझाडे, रॉकगार्डन व आसपासच्या वनश्रीचा वेगवेगळाच देखावा दिसतो.'

आपल्या प्रेक्षणीय स्थळांचा संपूर्ण आस्वाद घेता यावा म्हणून पर्यटकांसाठी अमेरिकेत किती तऱ्हेची साधने उपलब्ध आहेत असा विचार मनात आला. आपल्या देशात कितीतरी दुर्ग व पर्वतशिखरांवरील देवालये आहेत. पण आपल्याला तेथे

पोहोचायला धड रस्ताही मिळत नाही याचे वाईट वाटते. अमेरिकेची जिद्द, कल्पकता आपल्याला कधी लाभेल असा विचार मनात आला.

माउंट रशमोरहून खाली उतरत आमचा रस्ता रॅपिड सिटीच्या दिशेने जाऊ लागला. रॅपिड सिटी हे शहर माऊंट रशमोरपासून २५ मैलांवर आहे. शहराच्या दक्षिणेकडे ६ मैलांवर असणारे सरपटणाऱ्या प्राण्यांचे केंद्र (रेप्टाइल गार्डन्स) बघायला आम्ही गेलो. इतका मोठा अशा प्राण्यांचा संग्रह जगात दुसरीकडे कोठेही नाही. एकंदर जवळ जवळ २००० सरपटणारे प्राणी येथे ठेवलेले आहेत. त्यात मगरी, अजगर, नाग, सर्प, कासवे आहेत. याशिवाय ॲलिगेटर्सही आहेत. हे प्राणी अमेरिका व चीन देशातच आहेत. त्यांचे तोंड सुसरीपेक्षा आखूड व चपटे असते. त्याचप्रमाणे रॅटलस्नेक या नावाचे अमेरिकन विषारी सापही दिसते. ते २ फुटांपासून ८ फुटांपर्यंत लांबीचे असून त्यांच्या शेपटीच्या टोकाला चक्रे असतात. शेपटी हलवली की आवाज होतो. हा आवाज वाऱ्याने खिडकी हलली म्हणजे जसा होतो तसा वाटतो. विशिष्ट सरपटणाऱ्या प्राण्यावर जगणारे पक्षीदेखील येथे ठेवलेले आहेत. या सर्पालयात जाण्यात प्रवेशफी प्रत्येकी २ डॉलर्स आहे. काही ठराविक वेळी या शिकवलेल्या प्राण्यांच्या कुस्त्या किंवा इतर चढाओढी बघायला मिळतात. आम्ही गेलो तेव्हा ॲलिगेटरची कुस्ती चालू होती. रॅटल स्नेकचे विष कसे काढता येते हे येथे दाखवण्यात येते. याठिकाणी भूगर्भात असणारी सर्पाची एक गुहाही बघायला मिळते. लहान मुलांना राक्षशी कासवावरून हिंडवण्याचीही येथे सोय आहे.

कस्टरपासून ५ मैलांच्या अंतरावर एक मोठे स्फूर्तिस्थान पर्यटकांस भविष्यात पहावयास मिळेल. थंडरहेड पर्वताच्या कुशीत एक अजस्त्र पुतळा कोरला जात आहे. हा पुतळा तयार होईल तेव्हा तो ५६३ फुट उंच व ६४१ फूट लांब असेल. कॉर्कझऐक झिऑल कॉस्थी या नावांच्या शिटणकराने लागोटा इंडिअन लोकांच्या आमंत्रणावरून १९४७ साली हा प्रकल्प सुरू केला. आणखी पाच मुलगे व पाच मुली व पत्नी रूथ हिच्या मदतीने त्याने हे काम हाती घेतले. तो पुतळा तयार होईल तेव्हा त्याच्यावर एक कोटी डॉलर्स खर्च झालेले असतील असा अंदाज होता. पण साऊथ डॅकोटा डिपार्टमेंट ऑफ टूरिझम यांनी अलीकडे प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणे तो पुतळा अजूनही पूर्ण झालेला नाही, आणि तो पुरा होण्यास अजूनही बराच अवधी लागेल. कदाचित २०५१ सालही उजाडेल. मध्यंतरी कॉर्कझॅक झिऑलकॉस्की (१९०८-१९८२) हा १९८२ साली मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूनंतर ही त्याची पत्नी व त्याचे कुटुंबिय हे काम पुरे करण्यात गुंतले आहेत. 'क्रेझी हॉर्स' हे शिल्प पूर्ण होईल तेव्हा ते जगातील सर्वात प्रचंड असे शिल्प असेल. झिऑलकॉस्कीन' माऊंट रशमोर येथील राष्ट्राध्यक्षांचे चेहेरे करण्याच्या कामातही मदत केली होती. पण नंतर त्या स्मारकालाही मागे टार्शल असे दुसरे एक प्रचंड स्मारक करावयाचे त्याने ठरविले. दुसरे महायुद्ध सपंल्यानंतर त्याने साऊथ डॅकोटा येथील एक डोंगर विकत घेतला व कार्याला सुरुवात केली. १९७५ सालापर्यंत त्याने या डोंगरातील ३० लक्ष वजनाचे दगड सुरूंगाने उडवून आपल्या कामात प्रगती केली होती. रशमोर येथे शिल्पकार

बोरग्लन याने उडविलेल्या एका दगडाच्या आठपट खडक झिऑलकॉस्कीने खोदून काढले आहेत.

'क्रेझी-हॉर्स' हा पुतळा म्हणजे क्रेझी हॉर्स नावाच्या एका शूर रेड इंडिअन वीरांचे स्मारक आहे. 'क्रेझी हॉर्स हे या योध्याच्या मूळ इंडिअन नावाचे इंग्रजी भाषांतर आहे. तो सिऑक्स इंडिअन लोकांचा अधिपती होता. त्याने लेफ्टनंट कर्नल कस्टर या अमेरिकेन् योध्याचा पराभव केला होता. तो अप्रतीम लक्षवय्या होता हा पुतळा भव्य अशा घोड्यावर बसलेला असेल. घोड्यांचे तोंड दक्षिणेकडे असेल. क्रेझी हॉर्सची नजर त्या दिशेकडे असणाऱ्या डोंगर दऱ्या व नद्या यांवर खिळलेली असेल. कारण त्याला त्यांचे विशेष प्रेम वाटत असे. पुतळ्याच्या परिसरातच रेड इंडिअन लोकांच्या कलाकृतींचे केंद्र आहे. तेथे हजारो कलाकृती ठेवलेल्या आहेत. त्यात शिल्पकाराने आपल्या पुतळ्याचे मॉडेल किंवा कलाकृती ठेवलेली आहे. हे म्युझिअम पाहण्याची फी प्रत्येकी सहा डॉलर्स आहे. चार माणसांच्या डॉलरला १५ डॉलर्स आकारतात. प्रवेश फीतून व लोकांनी दिलेल्या देणग्यातून शिल्पकाराला व त्याच्या कुटुंबियांना थोडीफार मदत होते. पण सर्व खर्च तो स्वत:च्या जबाबदारीवरच करीत आला आहे.

शिल्पकाराचे कुटुंबिय या स्मारकाजवळ असणाऱ्या ५६ खोल्यांच्या स्टुडिओवजा घरांत राहतो. पुतळ्याच्या जवळच कला व उद्योग यांचे केंद्र, इस्पितळ व युनिव्हर्सिटी निर्माण करण्याची त्याची मनीषा आहे. अमेरिकेत आलेल्या गोऱ्या लोकांचे रेड इंडिअन लोकांचा पराभव करून त्यांना रिझर्व्हेशन्समध्ये कोंबले हे जरी खरे असले तरी एक गोष्ट मात्र ना

कबूल करताही उभारली आहेत. एका गोऱ्या अमेरिकनाने एवढा खर्च व मेहेनत करून एका रेड इंडिअन माणसाचा पुतळा उभा करण्याचे स्वप्न उराशी बाळगावे हा काय विलक्षण प्रकार आहे! त्याच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे हे स्मारक नुसते एका महान रेड इंडिअन वीराचा सन्मान करण्यासाठी निर्माण होणार नसून ते मानवाच्या सनातन अस्मितेचे प्रतीक आहे. 'The memorial is intended to honour not only The great Indian Chief but also the unlongherable spirit of man.'

अमेरिकेतील पायोनिअर व्हिलेज, ज्युवेल, केव्हज, माउंट रशमोर व क्रेझी हॉर्स ही चार स्थळे देशातील एका वैशिष्ट्यपूर्ण घटनेची द्योतक आहेत इतर देशात जी प्रचंड कार्य करायला शासन, महानगरपालिका किंवा तत्सम यंत्रणासुद्धा धजत नाहीत, तशा तऱ्हेच्या कल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी अमेरिकेतील खाजगी व्यक्ती आपला स्वत:चा पैसा व मेहनत पणाला लावून झटतात व दीर्घ परिश्रमांनंतर त्या परिपूर्ण करतात. अखेरीस हे सर्व परिश्रम राष्ट्रसेवेला अर्पण केलेले आहेत. अमेरिकेच्या अफाट नव्या जगात मानवाला स्वतंत्रपणे नवीन क्षितिजे जिंकण्याची जिद्द कशी प्राप्त झाली व या सुपीक, कोऱ्या (व्हर्जिन) प्रदेशातील मिळविलेल्या संपत्तीचा मानवाने सर्व जनतेसाठी सौहार्दाने कसा विनियोग करून दिला याची ही उदाहरणे आहेत.

सरपटणाऱ्या प्राण्याचे संग्रहालय पाहिल्यावर आम्ही रॅपिड सिटीकडे गेलो. जेवणाची वेळ झाली होती. आम्ही एका रमणीय उपाहारगृहात गेलो व जेवण केले. संध्याकाळी वेळ

असल्याने बाहेरील बगीचात खुर्च्या, टेबले ठेवली होती. तेथेच आम्ही भोजन केले व कडोका गावाच्या दिशेने निघालो. कारण आम्हाला रात्रीचा मुक्काम तेथे करावयाचा होता.

कडोका येथील एका मोटेलमध्ये आम्हांला जागा मिळाली. आम्ही सकाळी उठलो, घाईघाईने तयार झालो. मोटारीत बसलो व एका रेस्टोरॉंमध्ये चहा व ब्रेकफास्ट घेऊन मिचेल शहराच्या दिशेने निघालो. मिचेल तेथून २७४ मैल अंतरावर होते.

साउथ डॅकोटामधील बहुसंख्य लोक खेड्यात व शेतावर राहतात. ते जर्मन, स्वीड, रशियन, डेन, झेक व डच अशा नानाविध युरोपिअन समाजातून आलेले आहेत. येथील तरुण लोक नोकरीसाठी कॅलिफोर्निया, मिनिआपोलिस, शिकागो, डेनव्हर या भागात जातात. ब्लॅक हिल्सच्या शांत वातावरणात काही सेवानिवृत्त श्रीमंत लोक राहतात. पण त्यांची संख्या फार नाही. एकंदरीत साउथ डॅकोटामधील लोक नोकरीधंद्यानिमित्त पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना आढळतात.

आम्ही मिचेल शहराच्या रस्त्याने जाऊ लागलो. तेव्हा आम्हाला कुरणातून गुरे, मेंढरे, चरताना दिसली. शेतामध्ये गहू व राय ही पिके डोलात होती. लहान शेते जाऊन आता मोठमोठी शेते येऊ लागली आहेत. १९३० साली ८३,००० शेते होती, त्याऐवजी आता ४५,००० शेते आहेत. सर्वसाधारण शेत १००० एकरांचे असते, शेती हा या भागात खूपच मोठा व्यवसाय आहे. शेती यंत्रांनीच चालते. शेतीबरोबरच गुरांचे संवर्धन करून त्यांची कत्तल करणे व त्यांचे मास पॅकबंद करणे हाही या भागातील प्रमुख

धंदा आहे. कत्तलखान्यातील जनावरांना इलेक्ट्रॉनिक रॉडस्नी बेशुद्ध करतात व मग त्यांच्या रक्तवाहिन्या कापून मांस पॅकबंद करतात.

मिचेल हे गाव जेम्स नदीच्या खोऱ्यात वसले आहे. या प्रदेशात गुरेढोरे पोसली जातात व धान्यही चांगले पिकते. त्यामुळे शेती, दुधदुभते व चीक तयार करणे हे धंदे विशेषेकरून लोकांना किफायतशीर होतात. याशिवाय कोंबड्या बाळगणे, गुरांचे मांस स्वच्छ करून त्याचे पॅकिंग करणे हे व्यवसायही या प्रदेशात लोकांना चरितार्थ मिळवून देतात.

परंतु मिचेलची प्रसिद्धी जर सबंध अमेरिकेत कशासाठी असेल तर ती तिथे असणाऱ्या धान्यप्रासादाबद्दल (कॉर्न पॅलेस) कारण असा 'राजवाडा' सबंध जगात हा एकच आहे. तो प्रथम १८९५ साली बांधण्यात आला. त्यावेळी त्याच्या बांधकामाला संपूर्णतः लाकूड वापरले होते व ही इमारत १०० ६६ फूट इतकी होती. अशा तऱ्हेचा राजवाडा बांधण्याचा प्रयत्न सू सिटी, आयोवा येथे प्रथम करण्यात आला होता पण तो यशस्वी झाला नाही. त्याच नमुन्यावर एक इमारत मिचेल येथे बांधण्यात आली. या राजवाड्याचा उद्देश साउथ डॅकोटामधील धान्याच्या प्रकारचे प्रदर्शन करणे व नाटके दाखवणे हा होता. त्याला 'धान्यपट्ट्याचे प्रदर्शन' (कॉर्न बेल्ट एक्झिबिशन) असे नाव देण्यात आले होते. १९०१ साली फार मोठा दुष्काळ पडला व त्यामुळे हे प्रदर्शन रहीत करण्यात आले. १९०५ साली जुनी इमारत पाडून नवीन बांधण्यात आली व तिला 'धान्याचा राजवाडा' (कॉर्न पॅलेस) असे नाव मिळाले. त्यानंतर १९२०-२१ सालात सध्या अस्तित्वात

असणारी इमारत बांधण्यात आली. १९३७ साली या राजवाड्याला मनोरे, घुमट कळस लावण्यात आले व त्यामुळे त्याचे स्वरूप मूर पद्धतीचे दिसू लागले. पण एकंदरीत पाहाता इमारतीची रचना भडक रंगाची व प्राचीन बिझेंटाइन पद्धतीची वाटते. १९३० सालापासून वाड्याच्या दर्शनी भागाचे स्वरूप बदलू लागले व ज्ञानवर्धन करणाऱ्या कार्यक्रमांपेक्षा करमणुकीच्या कार्यक्रमांना प्राधान्य मिळू लागले. असा धान्यप्रासाद जगात कोठेही नाही. हा 'राजवाडा' मे महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत पर्यअकांसाठी उघडा असतो. प्रवेश फी काहीही पडत नाही. सप्टेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यात येथे सात दिवस उत्सव चालू असतो. या आठवड्याला 'धान्य प्रासादसप्ताह' असे अभिधान प्राप्त झालेले आहे. या आठवड्यात येथे लोकप्रिय असे खेळ, जत्रा व घोड्यावरील रपेटीचे कार्यक्रम होतात.

राजवाड्याच्या अंतर्भागात ४५०० लोकांना बसता येईल एवढे रंगमंदिर आहे. या सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे इंडिअन नृत्य व आफ्रिकन जयस्मारक (ट्रॉफी) हे होय. त्यालाही प्रवेशफी नसते. हिवाळ्यात या नाट्यगृहाचा उपयोग शहरातील अनेक तऱ्हेतऱ्हेच्या धद्योगांसाठी होतो. हायस्कूल व कॉलेजच्या बास्केटबॉलसारख्या क्रीडाक्षेत्रातील चढाओढी, प्रदर्शने, सभा, संमेलने आणि इतर करमणुकीचे कार्यक्रम येथे होतात.

हेमंतऋतूत येथे गेल्यास पाहुण्यांना धान्यप्रासादाच्या बाहेरच्या भिंतीवरील फलकांवर कलाकार साज चढवताना दिसतात. जगप्रसिद्ध इंडिअन चित्रकार ऑस्कर हो हे या फलकांवर तऱ्हेतऱ्हेच्या कलात्मक कल्पना आखून देतात. हो टारपेपरवर

त्याचे आराखडे करून ठेवतो व त्यात निरनिराळ्या तऱ्हेचे धान्य धावून सजावट कशी करावयाची याची कल्पना काम करणाऱ्या लोकांना अगोदर देतो. त्याप्रमाणे ही हौशी मंडळी रंगीबेरंगी नाना प्रकारचे धान्य राजवाड्याच्या दर्शनी भागावरील चित्रफलकांवर लावतात. ही सजावट करताना धान्याचे संबंध कणीस घेऊन ते चित्रफलकांवरील आकृतीत खिळ्यांनी ठोकतात हे काम वाटेल त्याला करता येण्यासारखे नाही. त्यासाठी खास कसबी लोकच निवडले जातात. कणसातील धान्याचा भाग बाहेर दिसेल व चित्र परिणामकारक होईल अशा तऱ्हेने हे काम करावे लागते. निरनिराळ्या तऱ्हेची धान्ये, गवत यांचा उपयोग करून या इमारतीचा दर्शनी भाग सजविण्यात येतो. यासाठी दरवर्षी धान्याच्या राशीच्या राशी आणाव्या लागतात. १९२९ साली ७२३० कणसांच्या जुड्या व ४१८० पौंड वजनाचे धान्य या कामाला लागले. हे सर्व धान्य या प्रांतातच उगवणारे असते.

हा धान्यप्रासाद पाहिल्यावर आम्ही सू फॉल्सकडे जाण्यास निघालो. ७१ मैलांवर असणाऱ्या सू फॉल्सजवळ साउथ डॅकोटा स्टेटची सीमा संपली व आम्ही आयोवा प्रांतात प्रवेश केला. सू फॉल्सपासून सू सिटी हे शहर ७०-७२ मैलांवर आहे. आम्ही तेथे पोचताच 'टाउन अँड कंट्री' या रेस्टॉरॉंमध्ये भोजन केले. याठिकाणी मात्र सबंध शाकाहारी भोजनाचे विविध प्रकार मिळू शकले.

त्यानंतर आम्ही सीडर रॅपिड्सच्या रस्त्याने जाऊ लागलो. आयोवा प्रांतातील हिरवीगार झाडी, हिरवी कुरणे, यातून रस्ता जाऊ लागला. वाटेत आम्ही कित्येक छोटी, छोटी गावे मागे

टाकली. प्रत्येक गावात सुरेख, नीटनेटकी, एकमजली, बंगलेवजा घरे दिसत. जवळच चर्च, वाचनालय, शाळा, डिपार्टमेंटल स्टोअर असावयाचेच वाटेत पाहिलेला एक देखावा माझ्या चांगल्या स्मरणात आहे. रस्त्याने एका घोड्याच्या गाडीतून जाणारे जुन्या पद्धतीच्या पोषाखातील लोक पाहून मला आश्चर्य वाटले. डॉ. वॉकर म्हणाले, 'हे एमिश जातीतील लोक आहे.' हे लोक मूळ स्वित्झरलंडमधील रहिवासी. सतराव्या शतकात झालेल्या धार्मिक छळामुळे ते अमेरिकेत आले. त्यांची वस्ती कलोना, इंडिपेन्डन्स, आलेबीन आणि मिल्टन या ठिकाणी आहे. हे लोक १८४० च्या सुमारास आयोवामध्ये आले. ते जर्मन भाषा बोलतात. मुलांना खास त्यांनी चालवलेल्या जर्मन शाळेत शिक्षण देतात. आपण एमिशनच रहायचे असा त्यांचा आग्रह असल्यामुळे ते आधुनिक यांत्रिक साधने वापरीत नाहीत. उदाहरणार्थ, इलेक्ट्रिसिटी, टेलिफोन, शेतीवरील यांत्रिक साधने, यांचा ते उपयोग करीत नाहीत. त्यांच्या घरात खिडक्यांना पडदे नसतात व भिंतीवर चित्रे वगैरे लावलेली दिसणार नाहीत. म्हणूनच ते मोटारीसारखी यांत्रिक वाहने न वापरता अजून घोड्याच्या गाड्या वापरतात. युनायटेड स्टेट्सच्या सुप्रीम कोर्टाने त्यांना स्वतःच्या मुलांना आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षण देण्याची परवानगी दिलेली आहे. त्यांचे पोषाख पाहिले तर ते अजून शतकातच वावरत आहेत असे वाटते.

माझ्या मनात विचार आला की अमेरिकेतून किती निरनिराळ्या भाषा बोलणारे व निरनिराळ्या संस्कृतीत वाढलेले लोक आलेले आहेत! सीडर रॅपिड्स जवळील अमाना येथेही एक

जर्मन लोकांची वसाहत पाहिली होती. ते लोकही आपली जर्मन राहणी व भाषा तशीच राखून आहेत. अमाना येथील खाद्यपदार्थ प्रसिद्ध आहेत. द्राक्षे, रूमार्ब (rhubarb) व स्ट्रॉबेरी यांच्यापासून होणारी दारू अमानामध्ये जुन्या पारंपारिक पद्धतीने यंत्राच्या सहाय्यापासून घरोघरी बनवतात. त्यांचे कार्य अगदी साधे असून तेथेच येथील रहिवासी प्रार्थनेला जातात. अमानाचे रहिवासी जर्मन भाषाच बोलतात. यांत्रिक प्रगतीतही ते मागे नाहीत. रेफ्रिजरेटर बनविण्यात त्यांचा नंबर पुढे आहे. व इतर यांत्रिक उपकरणेही ते तयार करतात. लोकरीची वस्त्रे, ब्लँकेटे अमनानांतून मुद्दाम आणतात. एग्मॅश लोकांप्रमाणेच अमानांनी जर्मन लोकही आपल्या पारंपारिक राहणीत कसलाही बदल करण्यात तयार नाहीत. इतकी वर्षे अमेरिकेत राहिल्यावरही हे लोक आपली जुनी संस्कृती जतन करीत आहेत. अमेरिकन शासनही त्यांना तसे करण्यास कायदेशीर रीत्या स्वातंत्र्य देत असते व असे असून अमेरिकेत एकजूट आहे. आपसात भांडणे व चढाओढी दिसून येत नाहीत. सर्व सामाजिक घटक आपापले भिन्नत्व राखूनही अमेरिकन नागरिक म्हणून अभिमान बाळगतात. भारताने हे त्यांच्यापासून शिकण्यासारखे आहे.

आम्हाला शांत व रम्य अशा वातावरणात असणारा ग्रेनफेल कॉलेजचा कँपस दिसला. अशा ठिकाणी अभ्यास करण्यात विद्यार्थ्यांना किती आनंद व उत्साह वाटत असेल व शहराच्या गडबडीपासून दूर असल्याने अध्ययन किती सुलभ होत असेल असा विचार मनात तरळून गेला.

संध्याकाळचे सहा वाजले. अमेरिकन पद्धतीप्रमाणे

जेवणाची वेळ झाली पण रविवार असल्याने एकही रेस्टोराँ उघडे नव्हते. अखेरीस एका लहानशा गावात एक छोटेसे उपाहारगृह दिसले. पण आत बसायला जागा नव्हती. आम्ही आवारात मोटर थांबवली. डॉ. वॉकर व दिलीप आत जाऊन थोड्याच वेळात बाहेर जेवण घेऊन आले. आमच्याप्रमाणे आणखीही काही लोक आतून जेवण आणून गाडीत त्याचा परामर्ष घेत होते, आम्ही जे मिळाले त्यावर आपली भूक भागवली व पुढे निघालो. आमची मोटर अधिकच रमणीय रस्त्यांवरून धावू लागली. रात्री साडेनऊ वाजता आम्ही सीडर रॅपिड्सला पोचलो. या शेवटच्या दिवशी आम्ही ६५० मैलांची दौड केली होती.

आमचा प्रवास संपला. मला त्याचे थोडेसे दु:ख वाटले. पुन्हा मला हे प्रदेश बघायला मिळतील का असा विचार मनात आला. आम्ही एकंदर २७५० मैलांचा प्रवास केला होता या प्रवासात मला खरी अमेरिका पहायला मिळाली. देशाच्या अंतर्भागातील रानेवने, डोंगरदऱ्या तर मी पाहिल्याच पण त्याबरोबरच अमेरिकन माणसाने निसर्गाच्या मूळ सौंदर्याला आपल्या कल्पकतेने व मेहनतीने दिलेला उठाव माझ्या मनात ठसून राहिला. अमेरिकेचा इतिहास, अमेरिकेला श्रीमंत करण्यास कारणीभूत झालेल्या त्या लोकांचे परिश्रम यांची मला कल्पना आली. अमेरिकेतील प्रेक्षणीय स्थळे सामान्य नागरिकांसाठी कशी सहजप्राप्त करण्यात आली आहेत हे माझ्यात ध्यानात आले.

अमेरिकेच्या अंतरंगाच्या या दर्शनाने माझे मनही खूपच उल्हसित व समृद्ध झाले. हे प्रवासवर्णन वाचून जर वाचकांनी त्याचा काही वाटा उचलला तर मी स्वत:स धन्य समजेन. ☐☐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुप्रवास
दा. क्र. 823
संग्रह शाखा

REFBK-0029558

REFBK-0029558